शनिवार, २३ मार्च २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २१०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 23 MARCH 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-210 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

## दैनिक आधुनिक केसरी - एऑन प्ले 'महाराष्ट्राचा महाकवी-2024' चे नामदेव तुकाराम चोथे विजेते

# सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव यांच्या हस्ते व वसंत मुंडे, डॉ. अतुल नाईक यांच्या उपस्थितीत 28 मार्चला पुरस्कार वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर : विश्वव्यापी मराठी दैनिक आधुनिक केसरीचे यू-ट्यूब चॅनल व एऑन प्ले आयोजित 'महाराष्ट्राचा महाकवी -2024' या आनलाईन काव्यवाचन स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून कवी नामदेव तुकाराम चोथे हे विजते ठरले आहेत. सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव यांच्या हस्ते व वसंत मुंडे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई प्रदेशाध्यक्ष यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार असून डॉ. अतुल नाईक डायरेक्टर एऑन प्ले यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवार, 28 मार्च रोजी सायंकाळी 4 वाजता छत्रपती संभाजीनगर येथील कुलस्वामिनी मंगल कार्यालयात या पुरस्कार वितरण होणार आहे. तसेच या वेळी प्रसिद्ध कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांच्या अध्यक्षतेत कवी, प्राध्यापक विजय पोहनेरकर, कवी विनोद जैतमहाल, कवयित्री कस्तुरी कुलकर्णी, कवी प्रशांत मुळे यांच्यासह स्पर्धेतील उत्कृष्ट कवींचे कविसंमेलन होणार आहे.**

**'दारुचा परिणाम' कविता सर्वप्रथम :** अनेक कवींना या स्पर्धेमुळे वेगवेगळ्या शहरांतून कविता सादर करण्याची निमंत्रणे मिळाली, तर नवकवींना आपल्या भावना जगापर्यंत पोहोचवण्याची संधी मिळाली. 'महाराष्ट्राचा महाकवी-2024' स्पर्धेचा निकालही जनता जनार्दनाच्याच हाती होता. ज्या स्पर्धक कवीच्या कवितेला जास्त प्रेक्षक पाहतील तसेच लाईक व कॉमेंट करतील तोच कवी विजेता होणार होता. या नियमानुसार कवी नामदेव तुकाराम चोथे हे विजेते ठरले आहेत. त्यांनी या स्पर्धेच्या अंतिम फेरीत सादर केलेली 'दारूचा परिणाम' ही कविता तब्बल 44 हजार प्रेक्षकांनी पाहिली. त्यांचा गौरव करण्यासाठी जास्तीत जास्त साहित्यप्रेमींनी उपस्थित राहावे, अशी विनंती दैनिक आधुनिक केसरी व एऑन प्ले परिवाराच्या वतीने करण्यात आली आहे.

**देशभरातून आल्या मराठी कविता :** कवींना ऑनलाईन व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी दैनिक आधुनिक केसरी यू-ट्यूब चॅनल व एऑन प्लेच्या संयुक्त विद्यमाने डिसेंबर महिन्यात 'महाराष्ट्राचा महाकवी-2024' या ऑनलाईन काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रातूनच नव्हे तर भारतातील दिल्ली, हैदराबाद, इंदोर, बऱ्हाणपूर, कोलकाता येथील कवींनी सहभाग नोंदवला होता. तब्बल 325 कवींनी आपल्या दर्जेदार कविता सादर करून ऑनलाईन साहित्यविश्वात एक क्रांती घडवून आणली.

**एकेका कवितेला 30 ते 40 हजार व्ह्यूज, लाईक, कॉमेंट मिळाल्या :** 'महाराष्ट्राचा महाकवी-2024' या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व मान्यवर कवींना या कार्यक्रमात प्रमुख अतिथींच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच या स्पर्धेतील सहभागी निवडक 20 कवींना कविता सादर करण्याची संधी देण्यात येणार आहे.

महाराष्ट्राचा महाकवी 2024



शुभहस्ते
मा. श्री. इंद्रजीत भालेराव
(सुप्रसिद्ध कवी)



उद्घाटक
मा. श्री. वसंत मुंडे
(प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई)



प्रमुख उपस्थिती
मा. श्री. डॉ. अतुल नाईक
(डायरेक्टर एऑन प्ले)



विजेते
मा. श्री. नामदेव तुकाराम चोथे



कविसंमेलनाच्या अध्यक्षा
मा. डॉ. सौ. संजीवनी तडेगावकर
(प्रसिद्ध कवयित्री)

**कधी**
गुरूवार दि. 28 मार्च 2024 सायंकाळी 4 वाजता

**कुठे**
कुलस्वामिनी मंगल कार्यालय, सिडको एन-8, आझाद चौकाजवळ, छत्रपती संभाजीनगर

**कवी संमेलनात सहभाग**



प्रा. विजय पोहनेरकर




विनोद जैतामहल



कस्तुरी कुलकर्णी



प्रशांत मुळे





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

ही संस्था नेमकी आहे तरी कशी, तिची स्थापना कोणी आणि कशासाठी केली हा इतिहास जाणून घेणे मनोरंजक आणि प्रेरणादायी आहे. एके काळी मुंबई उच्च न्यायालयात प्रसिद्ध वकील असलेले महादेव चिमणाजी आपटे हे एक ध्येयवादी व्यक्तिमत्व होते. वकील म्हणून आपल्या क्षेत्रात त्यांनी नावलौकिक कमावला होता. ' जोडोनिया धन उत्तम व्यवहारे..' अशा प्रकारचे त्यांचे जीवन होते. वृत्ती धार्मिक होती. आपल्या पूर्वजांनी केलेल्या कामाबद्दल प्रचंड आदर त्यांच्या मनात होता. प्राचीन ग्रंथात आणि हस्तलिखितांमध्ये अपार ज्ञान सामावले आहे आणि हा दुर्मिळ ठेवा जर आपण सांभाळून ठेवला नाही, तर भावी पिढ्या या मौल्यवान वारशाला पारख्या होतील असे त्यांना वाटत होते. त्यामुळे संपूर्ण भारतभर भ्रमंती केली. त्या काळात आजच्या इतके उत्तम रस्ते आणि वाहनांची सुविधा नव्हती अशा काळात त्यांनी प्रवास केला. हस्तलिखितांचा शोध घेतला. पडेल ते मोल देऊन ही हस्तलिखिते स्वतःसोबत आणली. ४ नोव्हेंबर १८८७ या दिवशी त्यांनी आनंदाश्रम या संस्थेची हा मौल्यवान ठेवा जतन करण्यासाठी स्थापना केली. आपल्या आयुष्यात सचोटीने कमावलेली सारी रक्कम त्यांनी या वास्तूच्या उभारणीसाठी वापरली. आपण कष्टाने कमावलेला पैसा खरे तर त्यांना आपल्या वारसांना वाटता आला असता पण तसे न करता त्यांनी ही संस्था उभारली. सन १८८८ मध्ये वासुदेव बापूजी कानिटकर आणि आणखी चौघा समर्पित आणि ध्येयवादी वृत्तीच्या व्यक्तींना घेऊन त्यांनी एक विश्वस्त मंडळ स्थापन केले. प्रख्यात ऐतिहासिक कादंबरीकार आणि मराठी आणि संस्कृत भाषेचे विद्वान हरी नारायण आपटे हे त्यांचे पुतणे होते. हरी नारायण आपटे यांनी १९१२ मध्ये अकोला येथे झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही भूषवले होते. अशा या व्यासंगी व्यक्तिमत्वाची त्यांनी आनंदाश्रम या संस्थेचे पहिले व्यवस्थापक म्हणून नेमणूक केली. सध्या वसंत अनंत आपटे आणि इतर विश्वस्त सेवाभावनेने संस्थेचे काम पाहत आहेत.
संस्थेतील वसतिगृहाच्या तळमजल्यावर एक संग्रहालय साकारले आहे. त्यात विविध प्राचीन वस्तू आहे. या वस्तू अमूल्य आहेत.



# आनंदी पहाट

## सकारात्मक सहजीवनात सुख-संवाद महत्वाचा

आधुनिक केसरी

सकारात्मक सहजीवन जगता येणं ही केवळ कला नसून ते एक शास्त्र आहे, असं म्हंटलं तर वावगं ठरणार नाही. ह्या शास्त्रात संवाद, सहवास, सहभाग, सहकार आणि सम-भोग या बाबींचा कृतीशील विचार करावा लागतो, त्यांचा अंगीकार करणं आवश्यक ठरतं. सहजीवन सकारात्मक आणि आनंदी करण्यासाठी साथ-सोबत करणाऱ्या प्रत्येकानं कर्तव्यापोटी स्वीकारलेली जबाबदारी समसमान घेतलेली असणं अभिप्रेत आणि अपेक्षित असतं. तशी जाणीव होणं महत्वाचं ठरतं. आपल्याला आयुष्य जगण्यासाठी सद्यःस्थितीत पैसाच लागतो, पण जीवन आजमावण्यासाठी कोणाचीतरी साथ, सोबत, संगत लागत असते. तुझं माझं जमेना, पण तुझ्याविना करमेना, अशी स्थिती असली तरीही आपल्याला मान्य होतं. आपल्यापैकी प्रत्येकाला सहजीवनाची गरज भासतेच. कदाचित, प्रत्येकाची तशी मानसिकता आयुष्यातील निरनिराळ्या टप्प्यांवर येत असेल. अर्थात, प्रत्येकाच्या मानसिक पातळींवर होत असलेल्या निरनिराळ्या स्थित्यंतरांवर ही गरज कमी-अधिक होत असेल. आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक अथवा शारीरिकदृष्ट्या जरी एकटं आयुष्य जगणं एखाद्यानं पसंत केलं अथवा स्वीकारलं तरीही त्याला मानसिकदृष्ट्या काहीवेळा, काहीबाबतीत जाणवणारा एकलेपणा मात्र आंतरिक अस्वस्थता निर्माण करण्यास कारणीभूत ठरतो, मानसिक ताण-तणावाचा अनाकलनीय दबाव उत्पन्न होत राहतो. प्रत्येक व्यक्तीला सहजीवनाची गरज, ही मानसिक पातळीवर अधिक आवश्यक असते. सहजीवनाच्या प्रवासाचा तेव्हाच प्रयास वाटत नाही, जेव्हा सकारात्मक दृष्टीकोनातून तो केला जात असतो. आपल्या सुख- दुःखांत, आयुष्यातील चढ-उतरांत सह-प्रवासी देखील आपली साथ-सोबत करणारा असणं योग्य ठरतं. ती साथ- सोबत देखील जीवन के साथ भी; जीवन के बाद भी, अशीच असणं अभिप्रेत असतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## जाग स्वधर्मात | आली देवा ||


वैतागलो होतो | संसार तापाने ||
विठ्ठल रूपाने | सुखावलो ||१||
संतसंग मज | लाभला भाग्याने ||
आले पुण्याईने | मुखी नाम ||२||
भोगोनिया भोग | झालो रिता आता ||
सटवाई माथा | कुरूवाळी ||३||
तुकाईचा बोल | ज्ञानाईचा सोस ||
आयुष्याचा पैस | श्वास झाला ||४||
रमलो नामात | गुंतलो कर्मात ||
जाग स्वधर्मात | आली देवा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# हितगुज





गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे,
दिंडोरी (नाशिक)

## चैतन्याचे उगमस्थान


प्रत्येक घरात समृद्धी, शांती, आरोग्यासाठी देवीची उपासना केली जाते. यासाठी 'दुर्गा-सप्तशती' ग्रंथाचे पठण उपयोगी आहे. निष्काम योगी, तांत्रिक साधक सौंदर्यलहरीचे पठण, जप करतात. नाथपंथात ही देवीच्या उपासनेला विशेष महत्त्व आहे. आदिशक्ती, महाकाली उपासनेच्या द्वारे अनेक शाबरमंत्र नाथांनी सिद्ध करून त्यांचा उपयोग लोककल्याणासाठी केला आहे. 'नवनाथ भक्तिसार' मध्ये सांगितल्यानुसार शाबरमंत्रांचे उगमस्थान, सिद्धस्थान भगवती देवी सप्तशृंगी आहे. श्री मत्स्येंद्रनाथाने त्र्यंबकेश्वर ते सप्तशृंगी अशी यात्रा विशेष पद्धतीने करून हनुमानादि देवतांना प्रसन्न करून विशिष्ट वनस्पती प्राप्त करून शाबरमंत्र निर्माण केले आहेत. याचा आध्यात्मिक अर्थ निश्चितच गूढ आहे. थोडक्यात आदिशक्ती जगदंबा संपूर्ण चैतन्याचे मूळ उगमस्थान आहे. मातृत्त्व भावनेने माया, स्वार्थ, विकारादिंच्या अज्ञान अंधःकारात चाचपडणार्या तमोगुणी मनुष्यातले चैतन्य ही आदिशक्ती जागृत करते. नश्वर शरीरात ती चैतन्याचे तेज निर्माण करते. ती सात्त्विकता, सद्गुण वाढवते. ती आत्मविश्वास बळकट करते. रणक्षेत्री ती सत्य पक्षाचा आधार बनून विजय मिळवून देते. ती मानवाच्या जाणीव क्षेत्रात प्रत्यभिज्ञा, पारमिता प्रज्ञेच्या रूपाने निवास करते. ती जेथे मानव कल्याण, लोकमंगल कार्य नित्य सुरू असते. तेथे त्याची शुभशक्ती बनून जाते. ही शक्ती म्हणजे पंचप्राणांचा अखंड स्त्रोत व सामंजस्य आहे. जेथे शक्ती मातेचे अस्तित्त्व आहे. तेथे समरसता सामंजस्य व अखंड आनंद आहे. या धरित्रीच्या कणाकणात आदिशक्तीचे चैतन्य विराजमान आहे. त्याचा अनुभव 'अमृतानुभव' आहे. नवरात्रात देवी या पृथ्वी लोकावर धनधान्यादिच्या रूपाने उतरते. म्हणून तिची उपासना करून आत्मचैतन्य प्रखर करणे, आवश्यक आहे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

तुरिया तुरियातीत है, आप्त महा पद जान ।
जाग्रित स्वप्न सुषोपती, षट व अवस्था मान ।।२५।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/२५
मूळ भाष्याचा मराठी अनुवादः
जागृत, स्वप्न, सुषुप्ति, तुरिया, तुरियातीत आणि आप्त या सहा अवस्था आहेत.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

## नाम-रूपाचा संबंध !

आधुनिक केसरी

नाम घेत असताना रूपाचे ध्यान आवश्यक आहे का ? वास्तविक, नाम आणि रूप ही भिन्न नाहीतच. पण नाम हे रूपाच्या आधीही असते आणि नंतरही उरते. नाम रूपाला व्यापून असते. राम जन्माला येण्यापूर्वी वाल्मीकींनी रामायण लिहिले, आणि रामाने मागाहून जन्म घेऊन त्यात वर्णन केल्याप्रमाणे आचरण करून दाखविले. म्हणजे रूप अस्तित्वात येण्यापूर्वी नाम होते, आणि रूप गेल्यानंतर आजही नाम शिल्लक आहे. देशकालाच्या पलीकडे जे कायम टिकते ते सत्य होय. प्रत्यक्ष आकाराला आलेली अनेक रूपे नाहीशी झाली तरी त्यांचे नाव टिकून राहते. म्हणजे नाम हे देशकालाच्या मर्यादेच्या पलीकडे असते; म्हणजे ते रूपापेक्षा जास्त सत्य असते. जे सत्य आहे ते श्रेष्ठ असलेच पाहिजे. तेव्हा नाम घेणे ही गोष्ट मुख्य आहे. ते घेत असताना रूपाचेही ध्यान राहिले तर उत्तमच; पण ते तसे न राहिले, तरी नाम घेत असताना रूपाचे स्मरण सूक्ष्मरूपाने असतेच असते. समजा, एका गृहस्थाच्या घरी राम नावाचा गडी आहे. तो गृहस्थ ' राम राम ' असा जप करीत बसला आहे, पण त्याचे लक्ष राम-रूपाकडे नाही, मनात काहीतरी दुसरेच विचार चालू आहेत. अशा वेळी त्याला जर एकदम विचारले की, ' तुम्ही कुणाचे नाव घेत आहात ? ' तर अर्थात् 'रामाचे', असेच उत्तर तो देईल. हे उत्तर देताना त्याच्या मनात ' दाशरथी राम ' हीच व्यक्ती असणार, ' राम गडी ' ही व्यक्ती नसणार. याचाच अर्थ असा की, नाम घेत असताना रूपाचे ध्यान सूक्ष्मरूपाने आत जागृत असते. म्हणूनच, रूप ध्यानी येत नाही म्हणून अडून बसू नये. नामस्मरण करण्याचा अट्टाहास ठेवावा, त्यात सर्व काही येते. एखाद्या माणसाची आणि आपली ओळख असेल तर पहिल्याने त्याचे रूप पुढे येते आणि नंतर नाम येते. पण आपली त्याची ओळख नसेल, आणि आपण त्याला बघितलेला नसेल, तर त्याचे फक्त नाव येते. आज आपल्याला भगवंताची ओळख नाही, म्हणून त्याचे रूप माहिती नाही; परंतु आपल्याला त्याचे नाम घेता येईल. सध्यासुद्धा, त्याचे नाम घेताना त्याची आठवण आपल्याला होते हा आपला अनुभव आहेच. भगवंताचे रूप तरी निश्चीत कुठे आहे ? एक राम ' काळा ' तर एक राम ' गोरा ' असतो; एक राम 'लहान' तर एक ' मोठा ' असतो; पण सर्व रूपे एका रामाचीच असतात. भगवंत स्वतः अरूप आहे; म्हणून जे रूप आपण त्याला द्यावे तेच त्याचे रूप असते. यासाठी आपण कोणत्याही रूपामध्ये त्याचे ध्यान केले तरी चालते. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात आणि अखेर त्यामध्येच ती लीन होतात. म्हणून भगवंताचे नाम श्रेष्ठ आहे. हे त्याचे नाम तुम्ही आवडीने, अखंड घ्या आणि आनंदात रहा. **६. दानात दान अन्नदान, उपासनेत उपासना सगुणाची उपासना, आणि साधनात साधन नामस्मरण.**



## मुमुक्षुलक्षण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

माघ कृष्ण नवमी समर्थ रामदास नवमी समर्थांना व त्यांनी केलेल्या समाजोन्नती कार्याला माझा साष्टांग नमस्कार आता पर्यन्त मला समजलेले समर्थांचे विचार प्रामाणिक पणाने मांडण्याचा प्रयत्न केला. समर्थांचे आशीर्वाद कायम पाठीशी राहोत . लिहित असताना काही अधिक उणे झाले तर समर्थांची क्षमायाचना करून पुढील लिखाणासाठी प्रयत्न करते. शाश्वत आत्मज्ञान हवे आहे, त्यासाठी देवपण अंगी आले पाहिजे. आपण सर्व मनुष्य जन्माला आलेलो आहोत. माणसाच्या मनात असलेल्या भावभावना, आनंद,राग,द्वेश,ईर्षा,जय पराजय स्नेहभावना या सर्व गोष्टी मनुष्य जन्माच्या जणु काही सोबती आहेत. या सर्वांवर विजय मिळवून शाश्वत सत्य जाणुन देवत्वाकडे वाटचाल करणे म्हणजेच संसारात अंतिम सत्या पर्यन्त पोहचणे होय.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २३ मार्च २०२४
adhunikkesari.com

# आम्ही अरविंद केजरीवालांच्या पाठिशी

## शरद पवार : भाजपवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : दिल्लीचे मुख्यमंत्री तथा आप पार्टीचे नेते अरविंद केजरीवाल यांना दोन तासाच्या चौकशीनंतर अटक केली. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी भाजपवर हल्लाबोल केला आहे. शरद पवार म्हणाले की, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीने केलेली अटकेची कारवाई चुकीची आहे. लोकशाहीचा गळा दाबण्याचं काम सुरु असल्याचं यातून स्पष्ट दिसून येत आहे. आम्ही मोठ्या ताकदीने अरविंद केजरीवाल यांच्या पाठिशी उभे राहू. याची किंमत भाजपला आणि केंद्र सरकारला मोजावी लागेल, असेही शरद पवार म्हणाले.**

पवार म्हणाले की, निवडणुकीच्या काळामध्ये भाजपकडून भीती पसरवण्याचे काम सुरू आहे. आधी झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अटक केली त्यानंतर आता अरविंद केजरीवाल यांना अटक केली, उद्या कोणाला अटक करतील माहिती नाही असे म्हणत शरद पवारांनी भाजपवर हल्लाबोल केला आहे.

पुढे शरद पवार म्हणाले की, भाजपकडून सत्तेचा गैरवापर केला जात आहे. राज्याच्या काही प्रमुख नेत्यावर ईडीचा वापर करून त्यांच्यावर कारवाई केली जाते. ज्या राज्यात ज्या नेत्यांचा प्रभाव आहे त्यांना तुरूगांत टाकण्याचे काम केले जात आहे.

अरविंद केजरीवाल यांना केलेली अटक चुकीची आहे. याआधी राज्यातील काही महत्त्वाच्या नेत्यांना अटक केली त्यानंतर आता मुख्यमंत्र्यांना अटक करण्यात आली, राज्यात धोरण ठरवणाऱ्या राज्याच्या प्रमुखाला अटक करणे ही चुकीची गोष्ट आहे, ही चितेंची बाब आहे असेही शरद पवार म्हणाले.

शरद पवार म्हणाले की, ईडी, सीबीआयचा वापर करणे निवडणुकीच्या काळात दहशतीचे वातावरण निर्माण करणे या सर्व गोष्टींचा मी निषेध करतो, आणीबाणीच्या काळात जे झाले नाही ते आता होत आहे, केजरीवालांच्या अटकेची किंमत भाजपला मोजावी लागणार आहे. केजरीवाल हे दिल्लीत बसून मोदींच्या




भूमिकेला विरोध करतात. त्यामुळेच त्यांच्याविरोधात ही अटकेची कारवाई करण्यात आली आहे असे पवार साहेब म्हणाले.

पवार म्हणाले की, आतापर्यंत देशात काही अपवाद सोडले तर निवडणुका या अतिशय मोकळ्या वातावरणात झाल्या आहेत. मात्र यावेळेसची निवडणूक कशी होईल याची शंका आहे. केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर सध्या सुरु आहे. विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. काँग्रेसची बँक खाती गोठवल्याने त्यांची प्रचार यंत्रणा थांबली आहे असे शरद पवार म्हणाले.


यावर सविस्तर बोलताना पवार म्हणाले की, मुख्यमंत्री केजरीवाल यांच्यावर भाजपाने कारवाई करत मोठे संकट स्वतःवर ओढावून घेतले आहे. यामुळे केजरीवाल यांनाच मोठे मताधिक्य मिळणार आहे. मागच्या वेळी विधानसभेत भाजपाल ७० पैकी तीन जागांवर विजय मिळवता आला होता, पण येणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये तितक्याही जागा त्यांना मिळणार नाही. पण केजरीवाल यांच्या नेतृत्वात १०० टक्के जागा निवडून येतील असेही शरद पवार यांनी बोलताना सांगितले आहे.

ते पुढे म्हणाले की, माढ्याची जागा महादेव जानकर यांनी लढावी, ही माझी वैयक्तीक मागणी आहे. मात्र सगळ्यांनी ऐकली पाहिजे. ज्योती मेटे यांच्यासंदर्भात अजूनही निर्णय झालेला नाही. आमच्याकडे आणखी लोक येतील, महायुतीची जागा निश्चित झाल्यावर आणखी माणसे येतील. राज ठाकरे यांच्या पक्ष एक ते दोन जागा लढवणार असल्याचे बोलले जात आहे त्यामुळे काही फरक पडणार नाही, असे पवार म्हणाले.

# मदरसेही शिक्षण विभागाच्या अखत्यारीत : अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशातील मदरशांविषयी अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या महत्त्वपूर्ण निकालाची चर्चा सुरू आहे. 'उत्तर प्रदेश बोर्ड ऑफ मदरसा एज्युकेशन ॲक्ट २००४' अंतर्गत राज्यातील सर्व मरदशांचे स्वतंत्र व्यवस्थापन आणि अल्पसंख्याक विभागाच्या अखत्यारीत निर्णय प्रक्रिया या कायद्यान्वये पारित करण्यात आल्या होत्या. मात्र, या व्यवस्थेला अलाहाबाद उच्च न्यायालयात देण्यात आलेले आव्हान न्यायालयाने ग्राह्य धरले असून हा पूर्ण कायदाच घटनाविरोधी ठरवला आहे. यासंदर्भात न्यायमूर्ती विवेक चौधरी आणि न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. अंशुमन सिंह राठोड नामक व्यक्तीने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठासमोर मदरशांविरोधात याचिका दाखल केली होती. उत्तर प्रदेश मदरसा बोर्डाच्या व्यवस्थापनासंदर्भात त्यांनी आक्षेप घेतले होते. तसेच, राज्यातील सर्व शिक्षण संस्थांचे व्यवस्थापन




शिक्षण विभाहाच्या अखत्यारीत येत असताना फक्त मदरशांचे व्यवस्थापन यूपी मदरसा बोर्डाच्या माध्यमातून अल्पसंख्याक विभागाच्या अखत्यारीत का देण्यात आले आहे? असा प्रश्न याचिकेत उपस्थित करण्यात आला होता. यासंदर्भात आता न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने मदरशांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहातील शिक्षण व्यवस्थेमध्ये सामावून घेण्यासाठी निश्चित अशी योजना आखण्याचे आदेश उत्तर प्रदेश सरकारला दिले आहेत. तसेच, यावेळी ज्या कायद्यान्वये मदरशांचं व्यवस्थापनं बोर्डाच्या माध्यमातून केलं जात होतं, तो यूपी बोर्ड ऑफ मदरसा एज्युकेशन ॲक्ट २००४ हा कायदाच न्यायालयाने घटनाविरोधी ठरवला. घटनेच्या धर्मनिरपेक्ष तत्वाच्या विरोधात जाणारा हा कायदा असल्याचे न्यायालयाने नमूद केले. यासंदर्भात न्यायालयाचे अंतिम आदेशपत्र हे वृत्त देईपर्यंत उपलब्ध होऊ शकलेले नाही.

गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात उत्तर प्रदेश सरकारने राज्यातील इस्लामिक शिक्षण संस्थांच्या सर्वेक्षणाचा निर्णय घेतला होता. तसेच, यातील मदरशांना परदेशातून देणग्या येत असल्याच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने विशेष तपास पथकाचीही स्थापना केली होती.



# गतिशील विकास, सर्वसामान्यांचा विश्वास हेच ध्येय : सुधीर मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**वणी :** भाजपाच्या तिकीटावर विधानसभेसाठी 16 मार्च 1995 ला जेव्हा पहिल्यांदा निवडून आलो तेव्हाही जनतेची सेवा हेच लक्ष्य होते, आज विश्वगौरव व राष्ट्रभक्त देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आग्रहावरून लोकसभा निवडणुकीमध्ये जनतेची सेवा करण्यासाठीच उभा आहे तेव्हा गतिशील विकास आणि जनतेचा विश्वास हेच ध्येय आहे असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. लोकसभा निवडणुकीसाठी चंद्रपूर मतदारसंघातून उमेदवारीची घोषणा झाल्यानंतर सुधीर मुनगंटीवार यांनी वणी येथे आयोजित बुथ कार्यकर्ता व शक्ती केंद्र प्रमुख संमेलनाला मंगळवारी संबोधित केले. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर मुंबईहून चंद्रपूरला परतल्यावर केलेल्या स्वागताने मी भारावून गेलो, असेही मुनगंटीवार म्हणाले. वणी येथील श्री विनायक मंगल कार्यालयात आयोजित या संमेलनाला वणी विधानसभेतील तीन हजार प्रमुख कार्यकर्ते, आघाडी प्रमुख उपस्थित होते. काँग्रेस पक्षाच्या कार्यप्रणालीवर टिका करताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, काँग्रेस हा पक्ष देशभक्तीच्या रूपात आलेला ' मायावी राक्षस ' असून सोशल मीडियाच्या माध्यमातून मतदारांना प्रलोभने दाखवण्यासही तो कमी करणार नाही. काँग्रेसच्या काळातच निवडणुकांमध्ये ईव्हीएम मशीन पहिल्यांदा वापरली गेली होती, हे काँग्रेस विसरले असल्याचे सांगत त्यांनी काँग्रेसचा उमेदवार कोणीही असला तरी निवडून एनडीएचाच उमेदवार येईल आणि एकदा निवडून आल्यानंतर काँग्रेसच्या वाट्याला हा मतदारसंघ जाऊ देणार नाही, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. निवडणूक जिंकण्यासाठी मोदी यांचे कार्य जनतेपर्यंत पोहाचवावे, त्यांच्या मनात विश्वास निर्माण करावा, शेतकरी व महिला हितासाठी कार्य करावे, असे आवाहन मुनगंटीवार यांनी केले. यावेळी आ. संजीव रेड्डी बोदकुलवार, आ. मदन येरावार, आ. अशोक उईके, संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोरडे, रवी बेलुरकर,राजेंद्र महाडोळे, राम लाखीया आदी भाजपा नेते मंचावर उपस्थित होते.



# उदयनराजेंची इच्छा

आधुनिक केसरी

देशासह महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीचे वातावरण ऐन उन्हाळ्यात तापले आहे. उमेदवारीवरून सर्वच पक्षात रस्सीखेच सुरू झाली आहे. महायुती-महाविकास आघाडीला अद्याप जागावाटप जाहीर करता आले नाही. भाजपने २० जागांवर त्यांचे उमेदवार जाहीर केले आहेत. २८ जागांवरील उमेदवार अद्याप जाहीर झालेले नाहीत. यातील १० जागांवर तिढा कायम आहे. सातारा लोकसभा मतदारसंघावर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने दावा सांगितला आहे. साताऱ्याचे खासदार राहिलेले उदयनराजे भोसले इथून लढण्यास इच्छुक आहेत. पण सध्या या मतदारसंघात राष्ट्रवादीचा खासदार असल्याने अजित पवारांच्या राष्ट्रवादीने साताऱ्यावर दावा केला आहे. राष्ट्रवादीने उदयनराजे भोसले यांना तिकीट देण्याची तयारीदेखील दर्शवली. पण हा प्रस्ताव भोसलेंनी फेटाळला आहे. निवडणूक लढेन तर कमळ चिन्हावरच अशी ठाम भूमिका त्यांना घेतली आहे. साताऱ्यात सध्या शिवेंद्रराजे भाजपचे आमदार आहेत. तर उदयनराजे राज्यसभेचे सदस्य आहेत. छत्रपतींच्या घराण्यातून असल्याने दोन्ही नावांना वलय आहे. उदयनराजेंना साताऱ्यातून लढायची इच्छा आहे. सध्या तदारसंघात राष्ट्रवादीचा खासदार असल्याने ही जागा अजित पवारांच्या पक्षाला सोडण्यात आली आहे. उदयनराजेंनी साताऱ्यातून लढावं, त्यांनी राष्ट्रवादीच्या तिकिटावर निवडणूक लढवावी असा प्रस्ताव आहे. पण हा पर्याय राजेंनी पूर्णपणे नाकारला आहे. निवडणूक लढवेन तर कमळावरच अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. ते उद्या केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची दिल्लीत भेट घेतील. या भेटीत साताऱ्याच्या जागेचा प्रश्न निकाली निघू शकतो. शिरुरमध्ये सध्याच्या घडीला साताऱ्यासारखीच परिस्थिती आहे. मागील निवडणुकीत पराभूत झालेले माजी खासदार आणि शिवसेना नेते शिवाजीराव आढळराव पाटील लोकसभा निवडणूक लढवण्यास उत्सुक आहेत. पण इथे राष्ट्रवादीचा खासदार असल्यानं ही जागा अजित पवारांच्या पक्षाकडे आहे. त्यामुळे ही जागा राष्ट्रवादी लढवेल. अजित पवारांनी इथून शिवाजीराव आढळराव पाटील यांची उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे शिवाजीराव आढळराव पाटील लवकरच राष्ट्रवादीत प्रवेश करतील आणि राष्ट्रवादीकडून लढतील हे स्पष्ट झाले आहे. शिरुरसारख्या घडामोडी साताऱ्यातही पाहायला मिळत असल्याने राजकीय घडामोडी गतिमान झाल्या आहेत.

# थोर क्रांतीकारक भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव

आधुनिक केसरी

**भारतमातेसाठी बलीदान करणारऱ्या क्रांतीकारकांमध्ये भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या तिघांची नावे एकत्रितपणे घेतली जातात. इंग्रज अधिकारी सँडर्स याच्या जाचातून मुक्तता करणाऱ्या या तिघांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. हे तिन्ही वीर देशभक्तीपर गीत गात गात आनंदाने फाशीला सामोरे गेले. 23 मार्च या दिवशी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचा बलीदानदिन आहे. या निमित्ताने हा लेखप्रपंच ...**



ख्रिस्ताब्द 1928 मध्ये भारतीय घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून `सायमन कमीशन' नावाचे शिष्टमंडळ भारतात आले. भारतात सर्वत्र या शिष्टमंडळाचा काळे झेंडे दाखवून निषेध करण्यात आला. त्या वेळी लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. `सायमन परत जा' च्या घोषणांनी सारा परिसर दुमदुमून गेला. जमाव पांगवण्यासाठी आरक्षकांनी केलेल्या अमानुष लाठी आक्रमणात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच त्यांचा अंत झाला. देशभक्तीने भारावलेल्या क्रांतीकारकांना हे सहन झाले नाही. क्रांतीकारकांनी लालाजींच्या मृत्यूला कारणीभूत असणाऱ्या लाहोर आरक्षक ठाण्यातील इंग्रज अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याचे ठरवले. त्याप्रमाणे लालाजींच्या पहिल्या मासिक श्राद्धाच्या दिवशी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष पालटून आरक्षक अधिकारी यांच्या निवासस्थानापाशी गेले. सँडर्स दिसताच सुखदेव याने संकेत केला. भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाच वेळी गोळया झाडून त्याचा बळी घेतला आणि तेथून पलायन केले. इंग्रज सरकारने तिघांना पकडण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली. तसेच त्यांना पकडून देणाऱ्याला पारितोषिक देण्यात येईल, अशी घोषणाही केली; परंतु बरेच दिवस आरक्षकांना हुलकावणी देत ते तिन्ही क्रांतीकारक भूमिगत राहिले. पुढे फितुरीमुळे ते पकडले गेले. शेवटी 23.3.1931 या दिवशी भारतमातेच्या या तिन्ही सुपुत्रांना फाशी देण्यात आली. **भगतसिंग यांचा अल्प परिचय :** जन्म : भगतसिंग याचा जन्म 27.9.1907 या दिवशी पंजाब राज्यातील एका सरदार घराण्यात झाला. बालपण : भगतसिंग 6-7 वर्षांचा असतानाची गोष्ट. तो शेतावर गेला असता शेतकरी गहू पेरत असलेला पाहून त्याचे कुतूहल जागृत झाले. त्याने विचारले "शेतकरीदादा, तुम्ही या शेतात गहू का टाकत आहात ?" शेतकरी म्हणाला, "बाळ, गहू पेरले की, त्याची झाडे होतील आणि प्रत्येक झाडाला गव्हाची कणसेच कणसे येतील." त्यावर तो म्हणाला, "मग जर बंदुकीच्या गोळया या शेतात पेरल्या, तर त्याचीही झाडे उगवतील का ? त्यालाही बंदुका येतील का ?" `या गोळया कशाला हव्यात', असे शेतकऱ्याने विचारल्यावर `हिंदुस्थानचे राज्य बळकावणाऱ्या इंग्रजांना मारण्यासाठी', असे क्षणाचा विलंब न करता त्याने आवेशपूर्ण उत्तर दिले. युवावस्था : पुरेसे महाविद्यालयीन शिक्षण, घरातील सर्व परिस्थिती अनुकूल असतांनाही त्यांनी देशसेवेसाठी आजन्म अविवाहित रहाण्याची प्रतिज्ञा केली आणि ती निभावूनही नेली. ते `नौजवान भारत सभा', `कीर्ती किसान पार्टी' आणि `हिंदुस्तान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' या संघटनांशी संबंधित होते.

**प्रखर देशप्रेम दर्शाविणारे प्रसंग**

प्रसंग 1 : फाशीची शिक्षा ठोठावल्यानंतर भगतसिंग आपल्या आईला म्हणाले, "आई, काळजी कशाला करतेस ? मी फाशी गेलो, तरी इंग्रज सत्ता येथून उखडून टाकण्यासाठी एका वर्षाच्या आत पुन्हा जन्म घेईन !"

प्रसंग 2 : फाशी जाण्याआधी एका सहकाऱ्याने भगतसिंग यांना विचारले, "सरदारजी, फांसी जा रहे हो । कोई अफसोस तो नही ?" यावर गडगडाटी हसून भगतसिंग म्हणाले, "अरे, या वाटेवर पहिले पाऊल टाकतांना `इन्किलाब झिंदाबाद' ही घोषणा सर्वत्र पोहोचावी, एवढा एकच विचार केला होता. ही घोषणा माझ्या कोट्यवधी देशबांधवांच्या कंठातून निघाली की, तो घोष या साम्राज्यावर घाव घालीत राहील. या छोट्या आयुष्याचे याहून मोठे काय मोल असेल ?"

**शिवराम हरी राजगुरू :** जन्म : 24.8.1908 या दिवशी महाराष्ट्र राज्यातील पुण्याजवळील खेड येथे एका देशस्थ ब्राह्मण कुटुंबात शिवराम राजगुरू याचा जन्म झाला. अचूक नेमबाजी, दांडगी स्मरणशक्ती याची त्यांना जन्मजात देणगी होती. कितीतरी ग्रंथ त्यांना मुखोद्‌गत होते. हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीचे ते सदस्य होते.

**राजगुरू याची सहनशीलता दाखवणारे प्रसंग :** प्रसंग 1 : एकदा राजगुरू भट्टीतल्या निखाऱ्यांवर आपल्या क्रांतीकारी मित्रांसाठी पोळ्या भाजण्याचे काम करत होते. तेव्हा एका सहक्रांतीकारकाने निखाऱ्यांची धग लागत असतांनाही शांतपणे पोळ्या भाजत असल्यामुळे त्यांची प्रशंसा केली. तेव्हा दुसऱ्या मित्राने त्याला जाणूनबुजून डिवचले आणि `त्याने कारागृहात गेल्यावर तेथे होणारा भयंकर छळ सहन केला, तरच मला कौतुक वाटेल', असे म्हटले. आपल्या सहनशीलते विषयी घेतलेल्या शंका न आवडून राजगुरूंने पोळया उलथण्याची लोखंडी सळई उन करून आपल्या उघड्या छातीला लावली. छातीवर टरटरुन फोड आला. पुन्हा एकदा त्यांनी तसेच केले आणि हसत-हसत त्या मित्राला म्हणाले,"आता तरी मी कारागृहातील छळ सहन करू शकेन याची निश्चिती पटली ना ?" राजगुरूच्या सहनशीलतेविषयी शंका घेतल्याने त्या मित्राला स्वतःचीच लाज वाटली. `राजगुरू, तुझी खरी ओळख मला आता झाली', असे सांगत त्याने राजगुरूची क्षमाही मागितली. प्रसंग 2 : कारागृहात अनन्वित छळ होऊनही राजगुरूंनी सहकाऱ्यांची नावे न सांगणे : `एका फितुरामुळे राजगुरु पकडले गेले. लाहोरमध्ये त्यांचा अनन्वित छळ करण्यात आला. लाहोरच्या तीव्र उन्हाळयात चहूबाजूंनी भट्टया लावून त्यामध्ये राजगुरूंना बसवण्यात आले. मारहाण झाली. बर्फाच्या लादीवर झोपवण्यात आले. इंद्रीय पिरगळण्यात आले. कशानेही ते बधत नाहीत, हे पाहिल्यावर त्यांच्या डोक्यावरून विष्ठेच्या टोपल्या ओतण्यात आल्या. कणखर मनाच्या राजगुरूंनी हा सर्व छळ सोसला; पण सहकाऱ्यांची नावे सांगितली नाहीत.


प्रसंग 3 : स्वतःच्या दुःखातही इतरांचा विचार करणारे राजगुरू : फाशी जाण्याआधी कारागृहातील एका सहकाऱ्याने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना राजगुरु म्हणाले, "बाबांनो, फासावर चढताच आमचा प्रवास एका क्षणात संपेल; पण तुम्ही सगळे वेगवेगळ्या शिक्षांच्या प्रवासाला निघालेले. तुमचा प्रवास अनेक वर्षे खडतरपणे चालू राहील, याचे दुःख वाटते. **सुखदेव थापर :** जन्म : सुखदेव यांचा जन्म पंजाब राज्यामध्ये, 15.5.1907 या दिवशी झाला. भगतसिंग आणि राजगुरू यांचे सहकारी हीच सुखदेव यांची प्रमुख ओळख. सुखदेव यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान सुखदेव हेही हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीचे कार्यकारी सदस्य होते. त्यांच्यावर क्रांतिकारक चंद्रशेखर आजाद यांच्या विचारांचा पगडा होता. लाहोर येथे नॅशनल कॉलेजमध्ये असतांना त्यांनी भारताचा वैभवशाली इतिहास आणि जगातील क्रांतीविषयक, तसेच रशियाच्या क्रांतीविषयक साहित्याचा अभ्यास करण्यासाठी एक मंडळ स्थापन केले. भगतसिंग, कॉम्रेड रामचंद्र आणि भगवतीचरण व्होरा यांच्या सहयोगाने त्यांनी लाहोर येथे नौजवान भारत सभेची स्थापना केली. युवकांना स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्यासाठी उद्युक्त करणे, शास्त्रीय दृष्टीकोन अंगिकारणे, साम्यवादाविरुद्ध लढा देणे आणि अस्पृश्यता निवारण ही या सभेची उद्दिष्टे होती. ख्रिस्ताब्द 1929 मध्ये कारागृहात असतांना कारागृहातील सहकाऱ्यांच्या होत असलेल्या अनन्वित छळाच्या विरोधात चालू केलेल्या भूक हरतालातही त्यांचा सहभाग होता.

**स्वातंत्र्यासाठी मृत्यूलाही आनंदाने कवटाळणारे थोर क्रांतीकारक :** 23 मार्च 1931 या दिवशी लाहोरच्या मध्यवर्ती कारागृहात भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आले. हसत हसत ते मृत्यूला सामोरे गेले. या थोर देशभक्तांना त्रिवार अभिवादन !

कु. प्रियांका लोणे
मो. 8208443401

# जरा याद करो कुर्बानी

आधुनिक केसरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२१५

**दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे.**



आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९३ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला ...... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शाहिद दिनी विनम्र अभिवादन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# भाजप फ्रंट फुटवर; काँग्रेस नेट प्रॅक्टिसमध्येच दंग

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभेच्या मैदानावर आता भारतातल्या सगळ्या टीम उतरल्या असून हा सामना कोण जिंकेल याकडे आता न केवळ भारत तर संपूर्ण जगाचे लक्ष लागलेले आहे . भाजप टीमला लोकसभेचा चषक जिंकण्याची आशा असून त्यादृष्टीने त्यांनी विरोधी टीमला चारशे पार च आव्हान देण्याचं ठरवलेलं आहे. महाराष्ट्राच्या टीमने ओपनिंग बॅट्समन म्हणून चंद्रपूरातील सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे दायित्व दिलं असून , सुधीर मुनगंटीवार यांनी सुद्धा महाराष्ट्रातील लोकसभेच्या मैदानावर उतरत थेट चौकार , षटकार आणि चोरट्या धावा घेत 400 पार च्या टारगेटमध्ये आपले शतक असावं यादृष्टीने जोरदार प्रयत्न सुरू केलेले आहेत . त्यासाठी त्यांनी आखलेली रणनीती ही अवाक करण्यासारखी आहे . ओपनिंग बॅट्समन म्हणून ग्राउंड वर उतरताच त्यांनी सगळ्यांना भ्रमणध्वनीवरून चारसो पार च टार्गेट पूर्ण करण्यासाठी आपण मला आशीर्वाद द्यावा असे आवाहन केले . तर लगेच विविध ठिकाणी छोट्या-मोठ्या मॅचेसचे आयोजन करत त्यांनी आपल्या धावा जमवणे सुरू केले आहे . एका बाजूला लोकसभा चषकातील भाजपाच्या टीमने चंद्रपुरातून चारसोपारचे टार्गेट पूर्ण करण्यासाठी थेट मैदानावर



उतरून फटकेबाजी सुरू केली असली तरी काँग्रेस टीमची मात्र अजूनही नेट प्रॅक्टिसच सुरू असल्याचे दिसत आहे . सुधीर मुनगंटीवार यांच्यासारख्या अनुभवी फलंदाजाच्या समोर तुल्यबळ असा गोलंदाज उभा करण्यास काँग्रेस अजूनही चाचणीच करत आहे. काँग्रेस टीमचे सर्वेसर्वा असलेल्या हायकामंड ने खेळाडूची निवड करण्यासाठी व्यवस्थापक, कोच , सल्लागार अशा सगळ्यांची बैठक थेट दिल्ली दरबारी आयोजित केली . यात मैदानात उतरण्यासाठी इच्छुक असलेले चंद्रपुरातील



धानोरकर आणि वडेट्टीवार या दोन्ही खेळाडू यांनी जोरदार लॉबिंग सुरू केली आहे . या लॉबिंग मध्ये आता राष्ट्रवादी काँग्रेस नावाच्या सहकारी टीमने थेट भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्ष असलेल्या शरद पवार यांची भेट घेऊन धानोरकर या सर्वोत्तम खेळाडू असल्यामुळे त्यांच्याकडे सुधीर मुनगंटीवार या फलंदाजाला रोखण्याचे कौशल्य व क्षेत्ररक्षणाची मजबूत टीम असल्याचे सांगत त्यांच्या निवडीसाठी प्रयत्न चालवले आहेत.

दुसऱ्या बाजूला सुधीर मुनगंटीवार यांची फटकेबाजी रोखण्यासाठी धानोरकर यांना क्षेत्ररक्षणात मदत करणाऱ्या सकल कुणबी समाजाने वडेट्टीवार नावाचा खेळाडू मैदानात उतरल्यास आम्ही क्षेत्ररक्षण करणार नाही . अशी थेट भूमिका हायकमांड कडे एका पत्रकाद्वारे केलेली आहे . तसे पत्रक थेट समाज माध्यमावर प्रसारित करून वडेट्टीवर नामक खेळाडूसमोर निवडीबाबतच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे . गेल्या आठवड्याभरापासून दिल्ली दरबारी हाय कमांड च्या मार्गदर्शनात तुल्यबळ खेळाडूची निवड व्हावी यासाठी धमासान अशा वातावरणात बैठकांचे सत्र सुरू असून अजूनही योग्य खेळाडूची निवड न झाल्यामुळे भाजपचे सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर वणी आर्णी लोकसभेच्या मैदानावर फ्रंट फूट वर येत धडाकेबाज फलंदाजीला सुरुवात केली आहे . परंतु विरोधी टीम असलेल्या काँग्रेसच्या खेळाडूची निवड होत नसल्यामुळे संपूर्ण टीम नेट प्रॅक्टिस मध्येच दंग असल्याचे चित्र आहे. भारतीय लोकशाहीचा चषक उंचावण्यासाठी भाजपचे ओपनिंग बॅट्समन सुधीर मुनगंटीवार यांनी सुरुवातीपासूनच तडाखे बंद फलंदाजीला सुरुवात केली असून त्यांच्या या फलंदाजीला आवर घालण्यासाठी योग्य असा गोलंदाजच काँग्रेस टीमला सापडू नये व आपल्या फटकेबाजीला क्षेत्ररक्षणाचा अडथळा येऊ नये अशी लॉबीग सुधीर मुनगंटीवार




सुद्धा करत असल्याचे दबक्या आवाजात सर्वत्र बोलल्या जात आहे . आपले शतक निर्विघ्नपणे पार पाडावे व लोकशाही चषक उंचविण्यामध्ये आपण अग्रेसर राहावे या दृष्टीने मुनगंटीवार हे सर्वतोपरी प्रयत्न करत असून याच प्रयत्नातला एक भाग म्हणून काँग्रेस खेळाडूंना नेट प्रॅक्टिस मध्येच दंग ठेवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे बोलल्या जात आहे. संपूर्ण देशासाठी आवश्यक असलेला लोकशाहीचा चषक कोण उंचावेल ? आणि कोण या शतकाच्या उंचावण्यामध्ये आपला हातभार लावेल ? या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न सुरू असून चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्रामध्ये मात्र अजूनही विरोधी टीम असलेल्या काँग्रेसने साधा खेळाडू सुद्धा निवडू नये याबाबत सर्वत्र कमालीचे आश्चर्य व्यक्त केले जात असून, क्षेत्ररक्षणासाठी उत्सुक असलेल्या समाजामध्ये मात्र प्रचंड अस्वस्थता निर्माण झालेली आहे.



## आ. किशोर जोरगेवार यांनी घेतली मोहन राजुरकर यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट

आधुनिक केसरी न्यूज

**उसगाव :** स्कुल बसच्या धडकेत उसगाव येथील मोहन राजुरकर या 26 वर्षीय युवकाचा मृत्यु झाल्याची घटना 18 मार्च ला उसगाव कॉर्नर जवळ घडली होती. या अपघातात दोघे जखमी झाले आहे. दरम्यान आज आमदार किशोर जोरगेवार यांनी उसगाव येथील मृतक मोहनच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली आहे. यावेळी सदर कुटुंबाला आर्थिक मदतही केली.

कामानिमित्त तीन मित्र दुचाकीने उसगांव वरून निघाले होते. दरम्यान उसगाव कॉर्नर जवळ एका खाजगी स्कुल बसने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात 26 वर्षीय मोहन राजुरकर यांचा जागीच मृत्यु झाला तर दोन जन जखमी झाले आहे. यातील एकावर चंद्रपूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहे. तर एकाला नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान आज शुक्रवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी उसगांव येथील मृतक मोहन राजुरकर यांच्या कुटुंबींयाची भेट घेतली आहे. यावेळी मृतकाच्या वडिलांनी घडलेल्या प्रकाराबाबत माहिती दिली. अपघात झालेला मार्ग बंद होता मात्र एससीसी कंपणीने हा मार्ग सुरु केला. त्यामुळे हा अपघात झाला असल्याचा आरोप यावेळी कुटुंबीयांनी केला. आमदार किशोर जोरगेवार यांनी यावेळी घुग्घुस ठाणेदार यांना दुरध्वनी वरुन संपर्क साधत घडलेला प्रकार समजून घेतला. सदर प्रकरणाची योग्य चैकशी करण्याच्या सुचनाही यावेळी आमदार किशोर यांनी केल्या आहे.

## निवडणूक खर्च निरीक्षकांनी घेतला आढावा

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – 2024 च्या अनुषंगाने 13 – चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाकरीता हेमंत हिंगोनिया यांची खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. हिंगोनिया यांनी कोषागार कार्यालय येथील स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालय येथे त्यांनी खर्च विषयाशी संबंधित यंत्रणेचा आढावा घेतला.

यावेळी त्यांनी सर्व नोडल अधिकारी व खर्च व्यवस्थापनासंदर्भात उपस्थित इतर अधिकारी व कर्मचा-यांना निवडणूक खर्च व्यवस्थापन वेळीच व योग्य प्रकारे करण्याच्या सुचना दिल्या. तसेच विधानसभा क्षेत्रनिहाय अतिसंवेदनशील भागाविषयी माहिती जाणून घेतली व अशा भागात विशेष उपाययोजना राबविण्याबाबत उत्पादन शुल्क विभाग, आयकर अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी यांना सुचना दिल्या. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांनी निवडणूक प्रक्रियेदरम्यान बँकांमध्ये होणारे दैनंदिन व्यवहार, संशयास्पद व्यवहारांवर विशेष लक्ष द्यावे. इलेक्ट्रॉनिक मिडीया, सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रसिध्द होणा-या जाहिरातींकडे लक्ष देण्याबाबत जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीच्या नोडल अधिका-यांना दिले.

बैठकीला जिल्हास्तरीय खर्च व्यवस्थापन कक्षाचे नोडल अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी अतुल गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनील कुंभे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक संजय पाटील, यांच्यासह सर्व विधानसभा क्षेत्राचे सहायक खर्च निरीक्षक, आयकर अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, बँक ऑफ इंडीयाचे व्यवस्थापक, सी-व्हीजील चे प्रतिनिधी, हेल्पलाईन सेंटरचे प्रतिनिधी व जिल्हा निवडणूक खर्चासंबंधी संपूर्ण टीमचे सदस्य उपस्थित होते.

नागरिकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी राहणार उपलब्ध : निवडणूक खर्च निरीक्षक हेमंत हिंगोनिया ( मो. 9404921146 ) हे खर्चाविषयक नागरिकांचे मत, तक्रारी ऐकूण घेण्यासाठी ‘बकूल’ व्हीव्हीआयपी कक्ष, कौस्तुभ बिल्डींग, वन अकादमी येथे सकाळी 9.30 ते सकाळी 11 वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत.



## आधुनिक केसरीचा इम्पॅक्ट; नकाने तलावाचा गाळ काढण्यास सुरुवात

### भविष्यात धुळेकरांच्या पाण्याची समस्या मिटेल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गेल्या महिन्याभरापूर्वी आधुनिक केसरीचे प्रतिनिधी आकाश सोनवणे यांनी धुळे शहरातील पाणीपुरवठा करणाऱ्या नकाने तलाव संदर्भात आधुनिक केसरी च्या यूट्यूब चैनल वर बातमी प्रसारित केली होती नकाने तलावाची दुर्दशा याला कारण कोण...? संपूर्ण तलाव कोरडा झाला आहे अशी बातमी प्रसारित केली होती व्हायरल बातमीमुळे माजी आमदार व नाम फाउंडेशन यांनी बातमीची दखल घेऊन नकाने तलावात जेसीबीच्या साह्याने गाळ काढण्यास सुरुवात केली आहे त्याचा फायदा भविष्यात नकाने तलावाचे पाणी कधीही आटणार नाही व सध्या नाम फाउंडेशन व माजी आमदार यांच्या साह्याने त्या ठिकाणी गाळ काढण्याचे काम जोरदार सुरू झाले आहे त्यासाठी धुळेकर जनतेला मोठा फायदा होणार आहे.आधुनिक केसरीच्या माध्यमातून अशा अनेक बातम्यांचा इम्पॅक्ट सुरूच आहे व कायम सुरू राहणार व आधुनिक केसरी हे सामान्य नागरिकांसाठी आशेचे किरण आहे.



## विविध समस्यांबाबत आ. कुमार आयलानी यांनी घेतली आयुक्त शेख यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** आ. कुमार आयलानी यांनी उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त अजिज शेख यांची उल्हासनगरच्या विविध समस्यांबाबत भेट घेतली. त्यामध्ये शहरातील ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण झाले आहे, त्या रस्त्यांचे डांबरीकरण, पावसाळी पावसाची तयारी तसेच नाल्यांची स्वच्छता, मुख्य रस्त्यांची दुरुस्ती, शहरातील मुख्य उद्यानांची स्वच्छता, स्मशानभूमीचे सुशोभीकरण, उल्हासनगर शहरातील पाणीटंचाई दूर करणे, उल्हासनगर शहरातील एमएमआरडीएकडून पास झालेल्या रस्त्यांची कामे जलदगतीने करणे अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

त्यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी, माजी स्थायी समिती सभापती राजेश वधारिया, भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत मिश्रा, जय कल्याणी यांच्यासह उल्हासनगर महापालिकेचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

# कोपरगावमध्ये शासकीय निधीचा अपहार

## एकाचे निलंबन मात्र उर्वरित दोषींवर कारवाई कधी ?

आधुनिक केसरी न्यूज

**किसन पवार**

**कोपरगाव :** तहसील कार्यालयामध्ये तालुकास्तरीय केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक यांचे मानधन वितरणातील झालेल्या भ्रष्टाचारामध्ये एका कर्मचाऱ्याला निलंबित केले असल्याचे समजते परंतु अजूनही त्यातील दोषारोप ठेवलेल्या बड्या माशांवर कारवाई कधी होणार असा सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे. जवळपास १० महिने पहिले याची कुणकुण लागली होती. अहमदनगर जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी यांनी कोपरगाव तालुक्यातील २५ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक यांचे साठी प्रत्येकी दोन वर्षाचे रु.२४०००/- प्रमाणे एकूण ६ लाख रुपये अनुदान निधी कोपरगाव तहसिल कार्यालयास पाठवला होता.


त्याप्रमाणे तहसिलदार यांनी सोबत यादी देऊन ६ लाख रुपयांचा निधी ऑनलाईन द्वारे संबंधीतांचे खात्यांवर जमा केला. परंतु ज्यांचे खात्यावर रक्कम जमा केली त्या पर्यवेक्षकांची नावे पाहीली असता सदरच्या यादीतील नावे बघून खरा भांडाफोड झाला. त्या यादीमधील सर्व नावे ज्यांचा काहीही संबंध नाही अशी असल्याचे दिसून आले. एकाच कुटुंबातील दोघा दोघांच्या नावावर व एकाच नावावर दोन दोन तीन तीन वेळेला निधी जमा झालेला आहे. खरे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक यांची यादी ची मागणी केली यादी मिळवण्याचा प्रयत्न केला परंतु त्याबद्दल टाळाटाळ करण्यात आली.

उपविभागीय अधिकारी यांनी आपला चौकशी अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर केलेला आहे त्यामध्ये तीन जणांना दोषी धरण्यात आलेले आहेत व कारवाई प्रस्तावित केलेली आहे परंतु अहवाल सादर करून दीड महिन्यापेक्षा जास्त कालावधी लोटलेला आहे तरी अजून एक कर्मचारी वगळता बाकीच्यांवर कारवाई का झाली नाही असा सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे.

> जिल्हाधिकारी यांचे कडे संबंधितावर कारवाई होण्यासाठी तक्रार दाखल केलेली असून जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी यांना चौकशी करून अहवाल सादर करण्यास सांगितला तो त्यांनी सादर करून दीड महिना उलटला तरी अजून गुन्हा दाखल झालेला नाही त्यामुळे मी स्वत : कोपरगाव शहर पोलीस स्टेशनला संबंधितावर भ्रष्टाचाराचा गुन्हा दाखल होण्यासाठी पत्राद्वारे फिर्याद दिली आहे . **संजय काळे, सामाजिक कार्यकर्ते, कोपरगाव**

> निवडणूक क्लार्क राहुल साहेबराव शिरसाठ यांनी आपल्या नात्यातील लोकांनाच या निधीचे वितरण केले आहे . सोबत ज्यांना निधी ऑनलाइन टाकण्यात आला आहे त्यांची यादी पाठवत आहे यामध्ये खरे काम करणारे कोणीही नाही शिरसाट याला निलंबित करण्यात आले असून त्याच्यावर वरदहस्त असणारे अधिकारी अजूनही मोकाट आहेत त्यांच्यावरही कारवाई व्हायला हवी .
> **राहुल शिरसाठ महसूल सहाय्यक ( निवडणूक संकलक )**



महाराष्ट्र शासन
महसूल विभाग

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, कोपरगाव
यांचे कार्यालय, ता.कोपरगाव जि.अहमदनगर
Emailid:kopargaonrnt@gmail.com ☎ Phone No: ०२४२३-२२२७५३

विषय:- मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचे पर्यवेक्षक यांना मानधन वितरीत करणेबाबत..

वाचले:-१.मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडील आदेश क्र.निवडणूक/कार्या-१२(२)/२८८/२०२३ दि २५/०५/२०२३

क्र.आव्यवनु/अनुदान/ ८४/२०२३ **आदेश** कोपरगाव दि २०/०६/२०२३

ज्याअर्थी, मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी संदर्भ क्र.१ अन्वये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचे पर्यवेक्षक यांना मानधन वितरीत करणेकरीता सन २०२३-२०२४ साठी कोपरगावकरीता रक्कम रु ६०००००/- (अक्षरी रु सहा लाख मात्र) अनुदान प्राप्त झाले आहे.


त्याअर्थी, मी तहसिलदार कोपरगाव मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार कोपरगाव तालुक्यातील खालील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचे पर्यवेक्षक यांना सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे अनुदान वितरीत करणेबाबत आदेशीत करीत आहे.

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | पर्यवेक्ष संख्या | प्रत्येक पर्यवेक्षक यांना वितरीत करावयाची रक्कम (प्रति वर्ष १२०००/-प्रमाणे) २ वर्षाचे | एकुण मानधन प्रस्तावीत रक्कम रु | पर्यवेक्षकांचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोपरगाव | २५ | २४०००/- | ६०००००/- | सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे |

उक्त तक्त्यामध्ये नमुद एकुण मानधन लेशि २०१५००३२, १३-कार्यालयी रु ६०००००/- (अक्षरी सहा लाख मात्र) अनुदान सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षात खर्च करणेत यावे.

(संदिपकुमार भोसले)
तहसिलदार कोपरगाव

प्रत:-उपकोषागार अधिकारी, कोपरगाव यांना माहिती साठी रवाना.



BLO superviser mandhan kopargaon

| Sl no | BLO NAME | ACCOUNT DETAIL | BANK NAME | BRANCH | IFSC CODE | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | eknath nanasaheb najan | 50200015992012 | bandhan bank | RAHATA | BDBL0001274 | 24000 |
| 2 | Bhaskar punjaji najan | 50160009304306 | bandhan bank | RAHATA | BDBL0001274 | 24000 |
| 3 | Ravindra punja najan | 917010037045029 | AXIS BANK | shirdi | UTIB0000663 | 24000 |
| 4 | SONALI RAVINDRA NAJAN | 33270100007124 | BOB | SAKURI | BARB0SAKURI | 24000 |
| 5 | ARCHANA MININATH PATHARE | 3742535022 | CBI | KOLHAR BK | CBIN0281073 | 24000 |
| 6 | sagar satish rathod | 37403860681 | SBI | RAHATA | SBIN0004317 | 24000 |
| 7 | MININATH BABASAHEB PATHARE | 3286257288 | CBI | KOLHAR BK | CBIN0281073 | 24000 |
| 8 | ARCHANA MININATH PATHARE | 33270100009895 | BOB | SAKURI | BARB0SAKURI | 24000 |
| 9 | CHANDRAKALA SAHBEBROA SHIRSATH | 30580357137 | SBI | RAHATA | SBIN0004317 | 24000 |
| 10 | SAHEBRAO KONDAJI SHIRSAGAR | 322902010002576 | ubi | RAHATA | UBIN0532291 | 24000 |
| 11 | PRITI BALKRUSHANA BANKAR | 38338539550 | SBI | RAHATA | SBIN0004317 | 24000 |
| 12 | Bhaskar punja rajan | 111210027001106 | ubi | shirdi | UBIN0558770 | 24000 |
| 13 | savita maruti ghumare | 322902011008384 | ubi | RAHATA | UBIN0532291 | 24000 |
| 14 | pratiksha shankar gorde | 33270100000265 | BOB | SAKURI | BARB0SAKURI | 24000 |
| 15 | ramesh rajaram rajput | 38338595436 | SBI | RAHATA | SBIN0004317 | 24000 |
| 16 | ramesh baburao gaikwad | 38338595430 | SBI | RAHATA | SBIN0004317 | 24000 |
| 17 | shrikant pundlik rathod | 322902010052417 | ubi | RAHATA | UBIN0532291 | 24000 |
| 18 | salim nazim | 33270100009266 | BOB | SAKURI | BARB0SAKURI | 24000 |
| 19 | ASHOK LAHANU BHALERAO | 322802010111307 | ubi | pravranagar | UBIN0532282 | 24000 |
| 20 | ASHOK LAHANU BHALERAO | 322802010111307 | ubi | pravranagar | UBIN0532282 | 24000 |
| 21 | laxman sadeo bhalerao | 68027895575 | BOM | BABHALESHWE | MAHB0001608 | 24000 |
| 22 | mashisha shantaram kuldharam | 11388925252 | SBI | KOPARGAON | SBIN000414 | 24000 |
| 23 | mashisha shantaram kuldharam | 11388925252 | SBI | KOPARGAON | SBIN000414 | 24000 |
| 24 | Bhaskar punja najan | 111210027001106 | ubi | shirdi | UBIN0558770 | 24000 |
| 25 | SUNITA SANJAY JEJURKAR | 322902011016707 | ubi | RAHATA | UBIN0532291 | 24000 |
| | | | | | | 600000 |




# देशी-विदेशी दारूसहित कंटेनर जप्त

## श्रीराम पवार यांची मोठी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांना गोपनिय बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, मध्यप्रदेश राज्यातील सेंधवा कडुन शिरपुर मार्गे गुजरात राज्यात एक टाटा कंपनीचे कंटेनर मध्ये देशी-विदेशी दारुची अवैध वाहतुक करुन घेवुन जाणार आहे. अशी माहिती मिळाल्याने संपूर्ण पोलीस टीम राष्ट्रीय महामार्ग क्र. 52 वर पळासनेर गावाजवळ लोकसभा निवडणुक अनुशंगाने लावण्यात आलेल्या चेकपोस्टवर नाकाबंदी करुन सदर वाहनाचा शोध घेणे बाबत आदेशीत केल्याने चेकपोस्टवर नाकाबंदी दरम्यान वाहने चेक करीत असतांना बातमी प्रमाणे टाटा कंपनीचे कंटेनर येतांना दिसले. वाहनावरील चालकास वाहन थांबविण्याचा ईशारा केला असता सदर वाहन चालक याने त्याच्या ताब्यातील वाहन थांबविले. वाहन चालक यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव (1) विजयकुमार प्रतापसिंग वय 32 वर्षे रा. गाव- नवा ता. राजगड (सादुलपुर) जि. चुरु, राज्य- राजस्थान, क्लीनर (2) प्रदिपकुमार मानसिंग वय 33 वर्षे, रा. गाव- नवा ता. राजगड (सादुलपुर) जि. चुरु, राज्य- राजस्थान असे सांगीतले. सदर वाहनात भरलेल्या मालाबाबत विचारपुस केली असता त्यांनी कोणत्याही प्रकारचे समाधानकारक उत्तरे दिले नाही. करीता पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यात 20 लक्ष रुपये चि देशी विदेशी दारू मिळाली आहे असा एकूण कंटेनर सहित 48,48,008/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पेलीस अधीक्षक, धुळे श्री श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक श्री किशोर काळे, यांचे मार्गदर्शनाखाली शिरपुर तालुका पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. श्रीराम पवार, असई- रफिक मुल्ला, संतोष पाटील, संदिप ठाकरे,कैलास पवार,सुनिल पाठक, योगेश मोरे, संजय भोई,स्वप्नील बांगर, भुषण पाटील, कृष्णा पावरा, मनोज पाटील यांनी केली असुन सदर वाहन चालक व क्लीनर यांचेवर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आले आहे.

# लोकसभेसाठी गाव तिथे मराठा उमेदवार देण्याबाबत ऊद्या जरांगे पाटील यांची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** मराठा आरक्षण संदर्भात सगे सोयरे यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी मधुन आरक्षण पारित न केल्यामुळे मराठा समाजाच्या वतीने लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात गावागावातून उमेदवार उतरणार देण्याचे ठरविले आहे. यासाठीच उद्या दि.२४रोजी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंतरवली सराटी येथे मराठा समाजाची बैठक होणार आहे. या बैठकीमध्ये मराठा समाजाने प्रत्येक गावातून दोन उमेदवार द्यायचे, खर्च, पुढील रूप रेषा यावर चर्चा होणारं आहे. उमेदवार देण्यावरून जर उद्या बैठकीमध्ये निश्चित झाले तर मात्र,राजकीय उमेदवारांची दमछाक होणार आहे, तसेच उमेदवारांची संख्या अधिक वाढणार असल्याने निवडणूक आयोगाची डोकेदुखी वाढणार आहे. तालुक्यात मराठा समाजाच्या गावागावात बैठका झाल्या असून जोरदार तयारी चालू आहे. प्रत्येक गावातून दोन उमेदवार लोकसभा निवडणुकीत उतणार आहेत. त्याची जोरदार तयारी सुरू झाली आहे. या उमेदवारांचा प्रचार, डिपॉझिट, अन्य निवडणुकीचा खर्च मराठा समाज लोकवर्गणीतून करणार असल्याचे मराठा समाज बांधवामधून सांगण्यात येतं आहे. जर असे झाले अन् गावागावातून उमेदवार निवडणुकीच्या आखाड्यात उतरले तर माञ लोकसभा मतदारसंघात उमेदवारांची संख्या हजारच्या वर जाईल आणि ईव्हीएम मशीनच काय त बॅलेट पेपर सुद्धा काढण्यास अवघड होणार आहे. त्यामुळे पक्षाच्या प्रमुख विरोधी उमेदवारांची दमछाक होणार असल्याची चर्चा होत आहे. कारण कालच धाराशिव जिल्ह्यातील मविआ लोकसभा उमदेवार यांनी गाव बैठकी दरम्यान मराठा समाजाने आगामी लोकसभेसाठी उमेदवार देऊ नयेत.असे मत व्यक्त केले, यावरूनच आगामी काळात सर्व लोकसभेचे प्रमुख पक्षांचे उमेदवार नक्किच मराठा उमेदवाराची धास्ती घेत आहेत असे बोलले जात.

# पोलिसाचे अपहरण करून हत्या करणाऱ्या जहाल नक्षल समर्थकास पोलिसांकडून अटक

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** पोलीस शिपायाचे अपहरण करून हत्या, जाळपोळ, आदी गुन्ह्यात आरोपी असलेल्या नक्षल समर्थकास (जनमिलिशिया) भामरागड येथे नाकाबंदीदरम्यान अटक करण्यात आली. पेका मादी पुंगाटी (४९, रा. मिरगुळवंचा, ता. भामरागड) असे त्याचे नाव आहे. त्याच्यावर दीड लाख रुपयांचे बक्षीस होते.

फेब्रुवारी ते मे दरम्यान नक्षलवादी 'टीसीओसी' कालावधी साजरा करतात. या दरम्यान ते सरकारी मालमत्तेचे नुकसान करणे, सुरक्षा दलाच्या जवानांवर हल्ला करणे व इतर प्रकारच्या सरकारी कामात अडथळे आणून जाळपोळ करणे अशी कृत्ये करत असतात. टीसीओसी कालावधी तसेच आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस दलाने २१ मार्च रोजी भामरागड परिसरात नाकाबंदी सूरू केली होती. क्युआरटी, सीआरपीएफचे जवान व भामरागड पोलीस कर्तव्य बजावत असताना नाकाबंदीच्या ठिकाणी एक व्यक्ती संशयास्पदरीत्या वावरत असल्याचे निदर्शनास आले. त्यास ताब्यात घेऊन अधिक सखोल चौकशी केली असता तो कुख्यात नक्षल समर्थक पेका पुंगाटी असल्याचे समोर आले. त्यानंतर त्यास अटक केली. १९ डिसेंबर २०२३ रोजी नक्षलवाद्यांनी हिद्दुर गावामध्ये असलेल्या गोटुलजवळ लावलेले ३ ट्रॅक्टर, एक जेसीबी पेटवून मजुरांना मारहाण व दमदाटी केली होती. या गुन्ह्यात तो सामील होता. सन २०१६ मध्ये एका पोलीस शिपायाचे अपहरण करुन खून केल्याच्या अनुषंगाने भामरागड येथे दाखल गुन्ह्यात देखील त्याचा प्रत्यक्ष सहभाग होता. तो नक्षलवाद्यांना रेशनचे धान्य पुरविणे, गावातील लोकांना मिटींगसाठी बळजबरी गोळा करणे, सप्ताहामध्ये बॅनर लावणे, पत्रके टाकणे अशी कामे करीत होता, असे चौकशीत निष्पन्न झाले आहे. पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर अधीक्षक (अभियान) यतीश देशमुख, अहेरीचे अपर अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक अमर मोहिते व सहकाऱ्यांनी ही कारवाई केली.

# राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करणे बंधनकारक : जिल्हाधिकारी विनय गौडा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करण्यासाठी 13-चंद्रपूर लोकसभा मतदार संघाकरीता जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली माध्यम प्रमाणिकरण आणि सनियंत्रण समिती (एम.सी.एम.सी.) स्थापन करण्यात आली. सदर समिती ही मिडीया कक्ष, जिल्हा माहिती कार्यालय, पहिला माळा, प्रशासकीय इमारत, चंद्रपूर येथे कार्यरत आहे. राजकीय जाहिरातीचे प्रमाणिकरण करून घेण्यासाठी आपले अर्ज माध्यम प्रमाणिकरण समिती कक्षात सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार निवडणूक आयोगाने राजकीय प्रचार जाहिराती बाबत नियमावली ठरवून दिली आहे. यानुसार राजकीय पक्ष व उमेदवार यांना दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हाईस मेसेजेस, सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळे यावर दर्शविण्याच्या जाहिराती तसेच मतदानाच्या आणि त्याच्या एक दिवस आधी वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती यांना माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीकडून (एम.सी.एम.सी.) पूर्वमान्यता घेणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय पक्ष, उमेदवार किंवा प्रतिनिधींनी जाहिरात प्रसारित होण्याच्या किमान तीन दिवसांपूर्वी प्रमाणिकरणासाठीचा अर्ज सादर करावा. तर अनोंदणीकृत राजकीय पक्ष किंवा इतर व्यक्तींनी किमान सात दिवस पूर्वी असा अर्ज करणे आवश्यक आहे. एम.सी.एम.सी समिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर 48 तासात तो निकाली काढेल. जाहिरात नियमानुसार नसल्यास एम.सी.एम.सी. समितीला प्रमाणीकरण नाकारण्याचा अधिकार आहे. समितीच्या निर्णयाविरुद्ध राज्य समितीकडे अपील दाखल करता येते. मात्र त्यानंतर केवळ सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. समितीने जाहिरातीत बदल सुचविल्यानंतर समितीकडून तसा संदेश प्राप्त झाल्याच्या 24 तासात राजकीय पक्ष किंवा उमेदवाराने त्यानुसार दुरुस्त्या करून नवीन निर्मिती सादर करणे आवश्यक आहे.

अर्ज कसा करावा : प्रमाणिकराणासाठीचा अर्ज विहित नमून्यात सादर करावा. सदर अर्ज मिडीया कक्ष, जिल्हा माहिती कार्यालय येथे उपलब्ध आहे. त्यात जाहिरात निर्मिती खर्च, जाहिरात प्रसारण खर्च व कालावधी, उमेदवार किंवा पक्षाचे नाव, स्वतंत्र व्यक्ती असल्यास प्रतिज्ञापत्र आदी महत्वाच्या बाबींच्या नोंदीसह जाहिरात संहिता (2 प्रतीत) व दृक-श्राव्य चित्रीकरण सीडी किंवा पेनड्राइव्हमध्ये समिती कडे देण्यात यावा.

जाहिरातीमध्ये या बाबींना प्रतिबंध : जाहिरात संहितेनुसार राष्ट्रीय एकात्मतेला हानी पोहोचविणाऱ्या बाबी, धार्मिक भावना दुखावणे, भारतीय घटनेचा अवमान करणे, गुन्हा दाखल करण्यास प्रवृत्त करणे, कायदा व सुव्यवस्थेस बाधा निर्माण करणे, गुन्हेगारीचे उदात्तीकरण, महिलांचे चुकीचे चित्रण, तंबाखूजन्य किंवा नशा आणणाऱ्या पदार्थांच्या जाहिराती, हुंडा, बालविवाह यांना उत्तेजन देणाऱ्या जाहिराती प्रसारित करण्यास प्रतिबंध आहे.

तर गुन्हा दाखल : एखाद्या व्यक्तीला उमेदवार किंवा राजकीय पक्ष यांचा प्रचार करणाऱ्या जाहिराती देता येणार नाहीत. उमेदवाराचा प्रचार करणारी जाहिरात त्या उमेदवाराच्या अनुमतीशिवाय प्रकाशित झाली असल्यास प्रकाशकावर गुन्हा दाखल करता येतो.



# ईडीकडून मुख्यमंत्री केजरीवालांना अटक; 'आप'चे धुळ्यात आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) काल रात्री दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांना अटक केली. केजरीवालांच्या अटकेमुळे दिल्लीसह देशभरातील आम आदमी पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. केंद्र सरकारकडून सातत्याने विरोधी पक्षांवर होणाऱ्या ईडी कारवायांमुळे देशभरात नकारात्मक वातावरण निर्माण झालं असतानाच, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक झाल्यामुळे पुन्हा एकदा विरोधी पक्ष आणि आपच्या कार्यकर्त्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. केजरीवालांच्या अटकेचा निषेध व्यक्त करत धुळे जिल्ह्यातील आम आदमी पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारीना निवेदन देण्यात आल आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर ईडीनं केलेली अटकेची कारवाई चुकीची आहे. लोकशाहीचा गळा दाबण्याचं काम सुरू आहे. देशातील ही सर्वात मोठी वाईट घटना असून एका मुख्यमंत्र्याला बेकायदेशीर अटक करण्यात आली आहे. ही मोठी शोकांतिका असून याचा निषेध म्हणून आज आम आदमी पार्टीच्या वतीने धुळे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आलं आहे. निवेदन देतेवेळी आम आदमी पार्टीचे जिल्हा संयोजक तथा जिल्हाध्यक्ष हितेंद्र पवार, एडवोकेट विनोद सोनवणे, राजेंद्र खैरनार, ललित पाटील, हेमंत पाटील यावेळी उपस्थित होते.

# सोयगाव तालुक्यात अपेक्षितदराच्या प्रतीक्षेत बळीराजाचे सोयाबीन घरातच

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात सध्या सोयाबीनला चांगला दर मिळत नसल्यामुळे सोयाबीनचे भाव पडून आहे. एकीकडे एकीकडे सोयाबीन तेलाला मागणी आहे. मात्र दुसरीकडे सोयाबीनला उठाव नाही. त्यामुळे सोयाबीनचा भाव दिवसेंदिवस घटत आहे. असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य स्वातीताई अतुल इंगळे मोलखेडा यांनी सांगितले. भाव वाढीच्या अपेक्षेने शेतकरी साठवणूकीवर भर देतात. मागील दोन ते तीन वर्षापासून अनेक शेतकऱ्यांनी साठवलेला सोयाबीन दरवाढीच्या प्रतीक्षेत अद्याप घरात पडून असल्याची माहिती सावळदबारा येथील भुसार मालाचे व्यापारी मो रफीक मो शब्बीर यांनी दिली. मागील पाच ते सहा महिने झाले, तरी सोयाबीन भाववाढीची चिन्हे दिसत नाहीत. उलट दिवसेंदिवस भाव गडगडत आहेत. तर दुसरीकडे शेती उपयोगी साहित्याचे दर गगनाला भिडत आहेत. शेतीसाठी येणारा खर्च झपाट्याने वाढत आहे आणि उत्पन्न कमी होत आहे. त्यामुळे बळीराजा हवालदिल झाला आहे. सध्या बाजारात सोयाबीनचा भाव पाच हजार रुपयांपेक्षा कमी आहेत. त्यामुळे साठवणूक केलेल्या सोयाबीनचे काय करावे, असा प्रश्न सोयगाव तालुक्यातील शेतकरी वर्गाला पडला आहेत. यंदा दुष्काळी परिस्थितीचा सामना करत शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकवले. पेरणीपासूनच पाणीटंचाईचे संकट असल्याने अनेक शेतकऱ्यांनी दुबार पेरणी करून अतिशय कष्टाने पीक जगविले होते. निसर्गाच्या लहरीपणाने प्रतिकूल परिस्थितीत शेती करताना शेतकऱ्यांना भरमसाठ खर्च करून उत्पन्न मात्र अल्प मिळाले. त्यातच काढणीनंतरच भावात घसरण झाल्याने शेतकऱ्यांनी सोयाबीन विकण्यापेक्षा घरात साठविण्याचे ठरविले होते.आगामी काळात भाववाढ होईल आणि समाधानकारक दर मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांची होती. परंतु तसे झाले नाही, अशी माहिती स्वातीताई अतुल इंगळे यांनी बोलताना दिली.



**मात्र तालुक्यात पेरा घटण्याचा अंदाज**

तालुक्यातील शेतकरी खरीप हंगामात मका आणि सोयाबीन पिकांची पेरणी करतात . मात्र, यंदा सोयाबीन लागवडीतून शेतकऱ्यांच्या पदरात पडलेली निराशा बघता, येत्या खरीप हंगामात २० ते २५ टक्के सोयाबीनचा पेरा कमी होणार आहे . तर मका पिकास वर्षभर बाजारभाव टिकून असल्याने आता बहुसंख्य शेतकरी कापूस व मका पिकाकडे वळतील .

**मदन शिसोदिया तालुका कृषी अधिकारी सोयगाव**

**बळीराजाचा कर्जाचा डोंगर वाढला**

'गेल्या वर्षी दुष्काळ सदृश्य परिस्थितीमुळे सोयाबीन उत्पादनात मोठी घट झाली . त्यात बाजारभाव स्थिर नसल्याने सोयाबीन साठवणूक केली . पैशाअभावी बँकेचे, पतसंस्थांकडून कर्ज घेऊन रब्बी हंगामाची पिके उभी केली . अजूनही सोयाबीनची भाववाढ न झाल्याने चार पैसे मिळण्याची आशा आता मावळून कर्जाचा डोंगरच वाढत आहे .

**प्रा .मदनभाऊ डोखळे सामाजिक कार्यकर्ते डाभा ता सोयगाव**

# खंडाळ्याच्या महाविद्यालयास साहित्यिकांची भेट; विद्यार्थ्यांशी साधला संवाद

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** साहित्यिक हे खऱ्याअर्थाने समाजातील वास्तव परिस्थिती मांडण्याचा प्रयत्न करत असतात. साहित्यिकांसोबतचा संवाद हा काहीतरी चांगलं सांगणारा व समाज घडवणारा संवाद असतो. त्यांच्या संवादातील मार्गदर्शन नेहमीच महत्वपूर्ण असे ठरत असते. साहित्यिकांचा सहवास हा विद्यार्थ्यांना मिळाल्यास नक्कीच विद्यार्थ्यांना सुद्धा काहीतरी नवीन अनुभवता येते. असाच क्षण खंडाळा विभाग शिक्षण समिती संचलित सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अनुभवता आलेला आहे. नुकतेच खंडाळा येथील या महाविद्यालयास मराठी साहित्यिकांनी सदिच्छा भेट दिल्याने विद्यार्थ्यांना साहित्यिकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभलेले आहे.साहित्यिक नक्की काय असतात याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना घेता आल्याने खंडाळा विभाग शिक्षण समिती चे संस्थापक शिक्षण महर्षी शंकरराव गाढवे यांनी सुद्धा साहित्यिकांचे विशेष आभार व्यक्त केलेले आहेत. मराठी भाषेतील साहित्यकार, लेखक, पत्रकार संपादक महावीर रामचंद्र जोंधळे, इंदुमती महावीर जोंधळे, सक्षम समीक्षा संपादक प्रा.डॉ. शैलेश त्रिभुवन, सुनीता शैलेश त्रिभुवन प्रकाशक-शब्दाली प्रकाशन पुणे आदींनी सदिच्छा भेट दिली. यावेळी प्राचार्य डॉ. हणमंत जाधव यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.उपप्राचार्य डॉ प्रतिभा पाटणे यांनी परिचय व महाविद्यालय प्रगती याबद्दल संक्षिप्त माहिती दिली. यासोबत खंडाळा विभाग शिक्षण समिती चे संस्थापक शिक्षण महर्षी शंकरराव गाढवे यांच्याशी मनमोकळा संवाद झाला.शंकरराव गाढवे म्हणाले की, आमची संस्था स्वयंआधारे चालत असून, इथं क्षमता आणि पात्रता पारखून सेवक वर्ग नियुक्त केला जातो, इथला सेवक वर्ग जीव ओतून झोकून देतं काम करतो याचा सार्थ अभिमान आहे. साहित्यिक महावीर जोंधळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना खंडाळा विभाग शिक्षण समितीचे विशेष कौतूक केले. महावीर जोंधळे म्हणाले की,खंडाळा विभाग शिक्षण समितीच्या परिसरात




पाऊल ठेवता क्षणी नैसर्गिक संपत्ती सोबत शैक्षणिक संपत्ती ने समृद्ध असे वातावरण आहे, सर्व शाळा महाविद्यालयात कष्टकऱ्यांची पोरं शिकून मोठी होतायेत. याचा मला अभिमान आहे, असे सुद्धा महावीर जोंधळे यांनी गौरवोद्गार काढले. यावेळी खंडाळा विभाग शिक्षण समितीचे संचालक वसंतराव पंडित,महाविद्यालय नॅक समन्वयक प्रा.रुपाली बनसोडे उपस्थित होत्या. राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. अमीर इनामदार यांनी आभार मानले.



# प्रदेश काँग्रेसचे सचिव डॉ. नितीन कोडवते, डॉ. चंदा कोडवते भाजपामध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** जिल्ह्यातील काँग्रेस नेते, प्रदेश काँग्रेसचे सचिव डॉ. नितीन कोडवते व त्यांच्या पत्नी डॉ.चंदा कोडवते या दांपत्याने भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत शुक्रवारी भारतीय जनता पार्टी मध्ये प्रवेश केला. श्री.बावनकुळे यांनी त्यांचे स्वागत केले. भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला खा.अशोक नेते, आ.बंटी भांगडिया, बाबुराव घोडे, मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे,भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. कोडवते पती पत्नीच्या भाजपा प्रवेशामुळे भारतीय जनता पार्टीच्या संघटना वाढीसाठी मदत होईल असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. याप्रसंगी बावनकुळे म्हणाले की, डॉ. कोडवते यांनी कोरोना काळात गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी समाजाची निरपेक्षपणे सेवा केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत घडवण्याच्या संकल्पाला साथ देण्यासाठी डॉ. कोडवते दाम्पत्याने भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. भाजपामध्ये प्रवेश केलेल्या सर्वांच्या पाठीशी एक कुटुंब या नात्याने पक्ष संघटना खंबीरपणे उभी राहील. डॉ.कोडवते दांपत्याने कोणतीही अपेक्षा न ठेवता भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या होत असलेल्या विकासाने प्रेरित होऊन भाजपामध्ये आलेल्या कोडवते पती पत्नीच्या नेतृत्वाला योग्य संधी, सन्मान दिला जाईल अशी ग्वाही बावनकुळे यांनी यावेळी दिली. मोदी सरकारच्या विकास कार्याने प्रभावित होऊन आम्ही भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. पंतप्रधान मोदी यांच्या विकासाच्या संकल्पनेवर विश्वास ठेवून गडचिरोली जिल्ह्याचा विकासासाठी हा निर्णय घेतला आहे. यापुढे भाजपासाठी निरपेक्ष भावनेने काम करू असे डॉ. नितीन व डॉ.चंदा यांनी यावेळी सांगितले. डॉ.चंदा यांनी 2019 मध्ये गडचिरोली विधानसभा निवडणूक काँग्रेसकडून लढवत 70 हजार मते मिळवली होती.



# सावळदबारा परिसरात लागवडीच्या संगोपनाकडे सामाजिक वनीकरणाचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा व परिसरातील असलेले सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने करण्यात आलेली वृक्ष लागवडीला योग्य संगोपना अभावी सामाजिक वनीकरण विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष दिसून येते आहे वन विभागाचे काम आहे असलेल्या झाडांचे रक्षण करणे तर सामाजिक वनीकरण हे वृक्षरोपण करण्यास प्रोत्साहन देते नर्सरी उभारून जनतेला तसेच शाळा विद्यालय महाविद्यालयाच्या परिसरात लागवडीसाठी रोपे पुरवठा करणे यासाठी शासनाकडून सामाजिक वनीकरणाला लाखो रुपयाचा निधी शासन खर्च करतो मागील दोन-तीन वर्षात महात्मा गांधी रोजगार हमी  योजनेअंतर्गत वृक्ष लागवडी करण्यात आली आहे लागवड संगोपन व संवर्धन यासाठी शासनाची नियमित कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च केला जात असला तरी प्रशासकीय यंत्रणेच्या उदासीन धोरणाने वृक्षांच्या संवर्धना अभावी अनेक वृक्ष नष्ट होण्याची भीती आहे विविध प्रजातीच्या झाडांची लाखो रुपये




खर्च करून लागवड करण्यात आली मात्र सदर लागवड करण्यात आलेल्या झाडांची संगोपनासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने कोणतेही ठोस उपाययोजना करण्यात आली नसल्याने जवळपास 50 टक्के झाडे नष्ट झाली असून झाडांना पाणी देणे तर सोडा लागवड करण्यात आलेल्या झाडांच्या सभवतींचा केरा कचरा सुद्धा कापण्यात आलेला नाही लागवडीसाठी खोदण्यात आलेले अनेक खड्ड्यांमध्ये वृक्ष लागवड दिसुन येते नाही आहे  सामाजिक वनीकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून सामाजिक वनीकरणाचा निधी योग्य ठिकाणी वापरण्यात आला आहे का याचीही शहानिशा करून दोषीवर कडक कारवाईची मागणी  भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती मराठवाडा सरचिटणीस गोकुळसिंग राजपूत यांनी केली नसता आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

# होळी साजरी करा जपून

## मैदानाचा वापर करा : सभापती धरमसिंग चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात आनंद, उत्साह आणि उल्हास यांचा सण म्हणजे होळी. आपल्याकडे धुळवड व रंगपंचमी अशा दोन्ही दिवशी रंगोत्सव जल्लोषात साजरा होतो. आयुष्यात आनंद देणाऱ्या रंगांना या दिवशी विशेष महत्त्व आहे. त्यांची उधळण केलीच पाहिजे, पण जरा जपून. आपली आणि इतरांचीही काळजी घ्यावी असे आवाहन सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे. घेत रंग उधळले, तर रंगपंचमी नक्कीच आनंददायक होऊ शकेल. होळीच्या उत्सवाला विजेच्या अपघाताने गालबोट लागू नये यासाठी होळी पेटवितांना संभाव्य अपघात टाळण्याकरिता आवश्यक ती खबरदारी घेत होळीचा आनंद व्दिगुणित करण्याचे आवाहन सभापती चव्हाण यांनी केले आहे.



होळी पेटविताना सभोवताली वीजवाहिन्या किंवा वितरण रोहीत्रे नाहीत याची खातरजमा करून घ्या, अन्यथा होळीच्या ज्वाळांनी वीजवाहिन्या वितळून जीवंत तार खाली पडून भीषण अपघात होण्याची शक्यता असते. याशिवाय अनेक ठिकाणी वीजवाहिन्या भूमिगत असल्याने, त्यापासून लांब अंतरावरच होळी पेटवावी जेणेकरून होळीच्या उष्णतेपासून वीजवाहिन्या सुरक्षित राहतील, होळी पेटविताना शक्यतो मोकळ्या जागेचा वापर करा, ट्रक किंवा इतर वाहनांतून होळी आणताना होळीचा स्पर्श रस्त्यालगतच्या वीजवाहिन्यांना होणार नाही याची खबरदारी घ्या.

होळीच्या रात्री बरेचदा रस्त्यावर होत असलेल्या हुल्लडबाजीचा फटका परिसरातील वीज ग्राहकांनाही होत असतो, बेधुंद वाहन चालकांमुळे अनेकदा वीज वितरण यंत्रणेचे नुकसान होण्यासोबतच जीवित व वित्त हानी होण्याचा धोका असल्याने याबाबत आवश्यक ती खबरदारी घ्यावी असे आवाहन सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.

रंगोत्सव साजरा करताना पाण्याचे फवारे वीजवाहिन्यापर्यंत उडणार नाही याची काळजी घ्या. रंग भरलेले फुगे फेकताना ते वीजेचे खांब आणि वीजवाहिन्या यांना लागणार नाही याची खबरदारी घ्या.

विजेचा खांबांना स्पर्श करू नका. घरात होळी खेळताना वीज मिटर, वीजेचे प्लग, वीजतारा आणि वीज उपकरणांचा पाण्यापासून बचाव करा, ओल्या हाताने वीजेच्या बटनांना स्पर्श करू नका.

तातडीच्या मदतीची संभाव्य गरज पाहता २४ तास सुरू असणारे निशुल्क क्रमांकावर फोन करा.

# व्यापारी संकुल गाळे आधी पाडले; आता बांधकामासाठी साडेबारा कोटी कशासाठी

## दत्तात्रय गोर्डे यांचा अरोप

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यात होत असलेल्या विविध विकास कामावर खोचक टिप्पणी करत नागरिकांनी केलेल्या तक्रारी वरून पैठण तालुक्यात ग्रामीण भागात अद्यापही समस्या आहेत. विकास कामे चालू आहे, त्यात आम्हाला आडचणी निर्माण करायच्या नाही. परंतु आता बोगस कामे होवुच देणार नाही.

सध्या नाथ महाराज षष्ठी सोहळ्याला सुरवात होत आहे. माझ्या काळात नाथमंदीर परिसरात गाळे बांधकाम केले होते. परंतु ते पाडण्याचे राजकारण झाले आणि सहा वर्षे वाफरात असलेले गाळे कायमचे पाडले आणि आता पुन्हा त्याच जागेवर स्वतःच्या नावाने व्यापारी संकुल उभारत आहे. पत्रकार संवाद परिषदेत शिवसेना नेते,(उ.बा.ठा.) दत्तात्रय गोर्डे यांनी पैठण शहरात झालेल्या व होत असलेल्या विविध कामाचा आढावा घेत विकास कामाचे ईस्टिमेट फुगवून मंत्री महोदय पैसा कमवायचा सपाटा करत आहे. याकामी शिवसेना चौकशीची मागणी करणार आहे.

संत ज्ञानेश्वर उद्यानात होत असलेल्या बोगस कामाची पाहणी करून चौकशी करणार असुन नागरिका समोर मांडणार आहे. व्यापारी संकुलाचे गाळे छोट्या व्यवसाईकाना मिळणार नाही असा अरोप करत या ठिकाणी पाडलेल्या गाळे धारकांना गाळे मिळाले पाहिजे अशी आमची ठाम भूमिका आहे.





# संत एकनाथ कारखान्याच्या स्विकृत संचालकपदी अनिल घोडके, रवी बोडखे

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याच्या दोन स्विकृत संचालकाची चेअरमन CA सचिन  घायाळ यांच्या अध्यक्षतेखाली निवड करण्यात आली या निवड बैठकीत व्हाचेअरमन प्रल्हाद तात्या औटे  संचालक आबासाहेब मोरे, दत्तात्रय वाकडे, यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते. यावेळी  माजी नगरसेवक ज्ञानेश्वर घोडके, दीपक चव्हाण, अमरीश घोडके, अतुल देशपांडे, अतुल मारवाडी, प्रथमेश घोडके, गोपाल गरगडे, राजेश घोडके, अलीम शेख, कृष्णा पवार, नितीन रावत, अंकुश सुडके, बापू डोईफोडे यांनी यावेळी स्विकृत पदी निवड झालेल्या संचालकाचे स्वागत केले.

# प्रियकराच्या मित्राने प्रियकराचा खून करून लुटली प्रेयसीची अब्रू

## कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :**  प्रेयसीवर लैंगिक अत्याचार करून प्रियकराला ठार मारल्याची घटना कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी शिवारात घडली. या घटनेने कोपरगाव तालुका हादरून गेला आहे. तीन आरोपींविरुद्ध कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, मयत नागेश उर्फ नाग्या शिवराम चव्हाण (वय २३) रा. जेऊर पाटोदा, कोपरगाव याचे व फिर्यादी मुलीचे प्रेमसबंध होते. मयत हा फिर्यादी मुलीला त्याच्या मोटारसायकलवरून कोळपेवाडी येथील त्याचा मित्र आरोपी अर्जुन उर्फ भुर्ज्या गोपाल पिंपळे व आरोपी चांदणी पिंपळे यांचे घरी घेऊन गेला होता. रात्रीच्यावेळी मयत नागेश चव्हाण व आरोपी अर्जुन पिंपळे हे एका खोलीत तसेच फिर्यादी मुलगी व आरोपी चांदणी पिंपळे हे एका खोलीत झोपले असताना मयत नागेश चव्हाण हा पहाटे ४ ते ५ वाजेच्या दरम्यान फिर्यादी जवळ गेला व तिच्यासोबत बळजबरी करू लागला. त्याचा आवाज ऐकून आरोपी चांदणी पिंपळे ही देखील फिर्यादीच्या जवळ गेली. तेव्हा मयत नागेश चव्हाण व आरोपी अर्जुन पिंपळे यांच्यात भांडणे सुरू झाली. घरात भांडण चालू असल्याने आरोपी चांदणी पिंपळे हिने आरोपी भुर्ज्याचा मित्र भाऊ पूर्ण नाव माहीत नाही यास बोलावून घेतले. त्यानंतर ५ वाजेच्या दरम्यान आरोपी भुर्ज्याचा मित्र भाऊ पूर्ण नाव माहीत नाही याने नागेश चव्हाण यास खाली पाडून त्याचे दोन्ही हात दाबून ठेवले. त्यानंतर आरोपी अर्जुन पिंपळे याने नागेश चव्हाणला जिवे मारण्याच्या हेतूने दोरीने गळा आवळून त्याचा खून केला तसेच आरोपी अर्जुन पिंपळे याने फिर्यादी मुलीला चाकूचा धाक दाखवून, तिच्या सोबत बळजबरीने लैंगिक अत्याचार करून कोंडून ठेवले. आरोपी चांदणी पिंपळे हीने मयत नागेश चव्हाण याला बांधण्यासाठी साडी आणली व तीनही आरोपींनी संगनमताने नागेश चव्हाण याचा मृतदेह गोणीत भरून, साडीने बांधून कोठेतरी पाण्यात टाकून मृतदेहाची विल्हेवाट लावून पुरावा नाहीसा केल्याची घटना कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी शिवारात घडली.

यामुळे कोपरगाव तालुक्यात एकच खळबळ उडाली असून वरील तीनही आरोपींविरुद्ध कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३०२, ३७६ (२) (आय), ३४२, २०१, ५०४, ५०६, ३४ सह बालकाचे लैंगीक अत्याचारापासून संरक्षण कायदा २०१२ चे कलम ४, ६, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अर्जुन पिंपळे याला पोलिसांनी अटक केली असून दोन आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. पुढील तपास पोलीस निरीक्षक संदीप कोळी करत आहेत.

# शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे लोकसभा निवडणुकीसाठी नऊ संभाव्य उमेदवार ठरले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे लोकसभा निवडणुकीसाठी पहिले 9 संभाव्य उमेदवार ठरले आहेत. या 9 जणांच्या यादीत शरद पवार यांनी सरप्राईज नावं दिली आहेत. महत्त्वाचं म्हणजे राज्यभरात चर्चेत असलेल्या माढा लोकसभेची जागा शरद पवारांनी महादेव जानकर यांच्या रासपसाठी सोडली आहे. त्यामुळे महायुतीसाठी हा मोठा धक्का असेल. माढ्यातून भाजपने रणजितसिंह निंबाळकर यांना उमेदवारी दिली असली तरी त्या जागेवरून महायुतीमध्ये घमासान सुरु आहे. याशिवाय पहिल्या 9 जणांची संभाव्य यादी एबीपी माझाच्या हाती लागली आहे. यामध्ये बारामती, माढा, सातारा, शिरुर, नगर दक्षिण, बीड आणि वर्धा या जागांचा समावेश आहे. रावेर आणि दिंडोरी जागा शरद पवारांकडे आली आहे. **जागा आणि संभाव्य उमेदवार :** बारामती-सुप्रिया सुळे, माढा-महादेव जानकर(रासप), सातारा-बाळासाहेब किंवा श्रीनिवास पाटील, शिरुर-अमोल कोल्हे, नगर दक्षिण-निलेश लंके, बीड-बजरंग सोनवणे किंवा ज्योती मेटे, वर्धा-अमर काळे, दुसरीकडे, अजित पवार गटातील धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय मानले जाणारे बजरंग सोनवणे यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. त्यांच्या या प्रवेशानंतर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला चांगलाच धक्का बसला आहे. असे असतानाच शरद पवार यांनी सूचक वक्तव्य केले आहे. आगामी काळात अजित पवार गटातील बरेच नेते परत येण्याची शक्यता आहे. महायुतीच्या उमेदवारांची घोषणा झाल्यावर ही इन्कमिंग आणखी वाढेल, असे पवार म्हणाले. त्यांच्या या विधानानंतर वेगेगळे तर्कवितर्क लावले जात आहेत. भविष्यात अजित पवार यांच्या गटातील नेते शरद पवार यांच्या गटात जाणार? असा प्रश्न विचारला जात आहे. माढ्यात शरद पवार यांनी सर्वप्रथम महादेव जानकर यांना महाविकास आघाडीमध्ये येण्यासाठी साद घालताना जागा सोडण्याची तयारी दर्शवली होती. आता थेट उमेदवारी जाहीर करून मोठी खेळी केली आहे. भाजपकडून पहिल्या यादीत रणजितसिंह निंबाळकर यांना उमेदवारी मिळाली, असली तरी सुरु असलेला वाद अजूनही थांबलेला नाही.

# आचारसंहितेचे उल्लंघन होतेय ? सीव्हिजिल ॲपवर करा तक्रार

## पहिल्या १०० मिनिटांत प्रतिसाद : भारत निवडणूक आयोगाने विकसित केला मोबाईल ॲप

आधुनिक केसरी न्यूज

**किसन पवार**

**कोपरगाव :** भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. या निवडणुका एकूण सात टप्प्यात होणार असून त्यासाठी मागच्या शनिवारपासून देशभरात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे.
त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल सिटीझन ॲप विकसित केले आहे. या ॲपवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर पहिल्या १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे.
आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करु नये याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. पण, काहीवेळेला या आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल ॲप विकसित केले आहे. या मोबाईल ॲपद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सीव्हिजिल ॲपवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.
हा सीव्हिजिल ॲप अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशिल, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओ प्रदान करणे आवश्यक आहे. ॲप




वापरकर्त्यांना त्यांच्या तक्रारींच्या प्रगतीचा मागोवा घेता येणार आहे.
सीव्हिजिल ॲप हा वापरकर्त्यांना आदर्श आचारसंहिताच्या उल्लंघनाची तक्रार करण्याची अनुमती देतो. नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतो. उल्लंघनाचे स्थान ट्रॅक करण्यासाठी जीपीएस वापरतो. वापरकर्त्यांना केवळ थेट घटना चित्रित करण्याची अनुमती देतो. तक्रारीच्या प्रगतीचा मागोवा घेतो. एन्ड्रॉईड मोबाईलमधील गुगल प्ले स्टोर आणि आयफोनमधील ॲप स्टोर या ॲपमध्ये जावून सीव्हिजिल (CVIGIL) सर्च करावे. त्यानंतर ॲप डाऊनलोड करा. त्यानंतर ॲप उघडून मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदारसंघ समाविष्ट करुन खाते तयार करा. तुम्हाला ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओंसह घटनेचे तपशील टाका. त्यानंतर तक्रार सबमिट करा.
या ॲप्लिकेशनचा वापर करून, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात न जाताही काही मिनिटांतच नागरिक राजकीय गैरव्यवहाराच्या घटनांची तक्रार नोंदवू शकतात. हा सीव्हिजिल ॲप जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडतो. ज्यामुळे एक जलद आणि अचूक कृती, देखरेख आणि अहवाल प्रणाली तयार होते.
या ॲपच्या अचूकतेसाठी ॲपमधून फक्त लाईव्ह लोकेशनवर आधारित फोटो, व्हिडिओ घेतले जातात. जेणेकरुन भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमुंना वेळेत कार्यवाही करणे शक्य होईल.
या ॲपवर तक्रार दाखल होताच भारत निवडणूक आयोग तुमच्या तक्रारीची चौकशी करेल आणि योग्य ती कारवाई करेल. या ॲपवरील डाटा हा सुरक्षित ठेवला जातो. हा डाटा इतर कोणत्याही थर्ड पार्टीला दिला जात नाही. याशिवाय हा डाटा एन्ड टू एन्ड इन्क्रिप्टेड ठेवला जातो.

# शिवसेनेच्या लोहा शहरप्रमुखपदी आनेराव

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** स्वतःच्या कर्तृत्ववावर सामाजिक, राजकीय, धार्मिक आदी क्षेत्रात सदा अग्रेसर असणारे व नावलौकिक मिळविलेले व्यक्तीमत्व म्हणजे सतीश आनेराव.



त्यांचा शहर व तालुक्यातील दांडगा जनसंपर्क व कर्तृत्व पाहता शिवसेना शिंदे गटाच्या लोहा शहर प्रमुख पदी सतीश आनेराव यांची नियुक्ती करून शिवसेना पक्षाने घेऊन त्यांच्यावर आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांना लोहा शहराची जबाबदारी सोपवत शहरप्रमुख पदी नियुक्ती केली.
याबाबत सविस्तर वृत्त असे की, लोहा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब पाटील कराळे यांच्या जनसंपर्क कार्यालयात एका शानदार कार्यक्रमात सतीश आनेराव यांना शहर प्रमुख पदी निवड झाल्याचे नियुक्ती पत्र शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब पाटील कराळे व शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा गीताताई पुरोहित यांच्या हस्ते देण्यात आले.
सदरील नियुक्ती पत्र हे शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश सचिव संजय मोरे यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले असून नियुक्ती पत्रात पुढे असे नमूद केले की,नमूद वंदनीय हिंदू ह्रदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार व युवा नेते खा.श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पक्षाच्या लोहा शहर तालुका प्रमुख पदी नियुक्ती करण्यात येत आहे.
वंदनीय हिंदू ह्रदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण सक्रियपणे प्रचार आणि प्रसार कराल शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य करावे व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.
तसेच सतीश आनेराव यांची शिवसेनेच्या लोहा शहर प्रमुखपदी नियुक्ती केल्याबद्दल त्यांचे संपर्क नेते आनंदराव जाधव, खा. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, शिवसेना जिल्हाप्रमुख आनंदराव पाटील बोंढारकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब पाटील कराळे, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा गीताताई पुरोहित यांनी अभिनंदन केले.



# सावळदबारा परिसरात बाजरी, ज्वारी बहरली

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात ज्वारी व बाजरीचे पीक बहरले असून, शेतकऱ्यांना चांगल्या उत्पादनाची अपेक्षा आहे. दरवर्षी पावसाची तूट पाहता शेतकऱ्यांचा कल कमी पावसात आणि कमी खर्चात चांगले उत्पादन देणाऱ्या पिकांकडे वाढला आहे. सावळदबारा परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी ज्वारी व बाजरीच्या पिकाची पेरणी केली आहे. यावर्षी रब्बी हंगामातील पेरणी झाल्यानंतर अतिवृष्टी झाल्याने उगवून आलेल्या उभ्या पिकाची नासाडी झाली. गहू, हरभरा पिकावर वखर फिरवून अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. काही शेतकऱ्यांनी कमी पाण्यात, कमी खर्चात जास्त उत्पादन देणाऱ्या बाजरीच्या पिकाची पेरणी केली होती. ते पीक आता बहरले आहे.
यावर्षी पावसाचे आगमन उशिरा झाल्याने खरीप हंगामाच्या पेरण्या उशिरा झाल्या होत्या. त्यातच मूग, उडदाची पेरणी करता आली नसल्याने ही दोन्ही पिके हातचे गेली. सोयाबीन, कपाशीचे पीक रिमझिम पावसाचे भरवशावर कसे तरी आले होते.दरम्यान, फुलधारणेवेळी अतिवृष्टी झाल्याने उत्पादनात कमालीची घट झाली. त्यातच उरलेल्या पिकाला योग्य प्रमाणात भाव मिळत नसल्याने पेरणीला लागलेला खर्च वसूल झाला नाही. खरीप हंगाम संपल्यानंत शेतकऱ्यांची मदार रब्बी हंगामावन असते. शेतकऱ्यांनी रब्बी हंगामाची पेरणी केल्यानंतर अतिवृष्ट झाल्यामुळे उगवून आलेल्या पिकाची नासाडी झाली होती. या पिकावर वखर फिरवून दुबान पेरणी करावी लागली, तर काह शेतकऱ्यांनी गहू, हरभरा पिकाकडे पाट फिरवून कमी पाण्यात, कमी खर्चात जास्त उत्पादन देणाऱ्या बाजरीच्य पिकाची पेरणी केली. सध्या बाजरीचे पीक बहरले असून चांगले उत्पादन होण्याची शेतकऱ्यांना अपेक्षा आहे.

# उमरी माहिती अधिकार संपर्क प्रमुखपदी गोवंदे

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हामदे**

**उमरी :** शहरातील आंबेडकर नगर येथील सामाजिक कार्यकर्ते संदीप गोवंदे यांची उमरी तालुका माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. माहिती अधिकार महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी १४मार्च २०२४रोजी संदीप पुंडलिक गोवंदे हे उमरी तालुका माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ संपर्क प्रमुख म्हणून पुढील तीन वर्ष्यासाठी किंवा पुढील आदेश येई परियंत लागू राहणार आहे, अशा असयाचे नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. उमरी संपर्क प्रमुख म्हणून दिलेले पत्र मानद स्वरूपाचे असून भारतीय संविधान भारतीय कायदे या माहीती अधीकार कार्यकर्ता फेडरेशन नियमाच्या अधीन राहून माहिती अधिकार अधिनियम २००५च्या व्यापक जनहितासाठी वापर करावा तसेच सामान्य नागरिकात व समाजा मध्ये माहिती अधिकार २००५प्रचार व प्रसार व्हावा हे पद जबाबदारीने वापर करावे असे नियुक्ती पत्र देऊन अभिनंदन करण्यात आले संदीप गोवंदे हे अनेक सामाजिक पक्ष संघनेचे पक्षाचे तालुकाध्यक्ष पद सांभाळले असून तरी माहिती अधिकार उमरी तालुकाध्यक्ष पदाची भर पडल्याने संदीप गोवंदे यांचे मित्रमंडळी व सामाजिक व राजकीय स्तरातून अभिनंदन होत आहे.



# फर्दापूर येथे माकडाने दुचाकीसमोर उडी घेतल्याने तरुण गंभीर जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथे जळगाव महामार्गावर फर्दापूर येथील बसस्थानकावर माकडाने अचानक दुचाकीसमोर उडी घेतल्याने दुचाकीस्वार तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवार सकाळी सात वाजेच्या सुमारास घडली. नितेश लंबे वय ३० रा. फर्दापूर हा तरुण आपल्या मोठ्या भावाला नेहमीप्रमाणे अजिंठा टी पॉइंट येथे कामाला सोडून परत येत असताना बसस्थानकावर सकाळी सात वाजेच्या सुमारास माकडाने दुचाकी समोर अचानक उडी घेतल्याने त्यात तो जखमी होऊन त्याच्या हाता पायाला गंभीर दुखापत झाली. पुढील उपचारासाठी त्याला खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अगोदर ही अश्या स्वरूपाच्या घटना या ठिकाणी घडलेल्या आहे. बसस्थानक परिसरात माकडांचा उच्छाद वाढल्यामुळे येथील हॉटेल व्यावसायिकांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो आहे. अजिंठा वनविभागाने माकडांचा बंदोबस्त करण्याची मागणी आता येथील वाहनधारक, व्यावसायिक करीत आहे.

# ग्राहकांना करावा लागणार आर्थिक अडचणींचा सामना

## नाणे टंचाईमुळे बँकांचे व्यवहार प्रभावित : आडात आहे पण पोहऱ्यात येईना

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** मार्च महिना म्हणजे जणूकाही बँकांच लग्नघाईच असते. दरवर्षीच मार्च मध्ये शेतकरी,मजूर, व्यापारी, ग्राहक, लघु उद्योजक असो की मोठे या सर्वांचाच बँकाशी जवळचा संबंध येत असतो. मात्र दरवर्षीच्या तुलनेत या वर्षी मात्र लवकरच बँकांना आर्थिक रोख नाणे टंचाई भासत आहे. शहरी भागातील बँकांना तर नाणे टंचाई भासातच आहे पण ग्रामीण भागातील नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणावर नाणे टंचाईचा त्रास सहन करावा लागत आहे. एकीकडे शासन म्हणते डिजिटल इंडिया परंतु प्रत्यक्षात मात्र अनेक नागरिकांना अद्यापही मोबाइल चे माध्यमातून कॅशलेस व्यवहार हाताळता येत नाहीत. त्यातच ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांना कर्जाची परत फेड करण्यासाठी मोठा जोडजमाव करून आपल्या कर्जाचा भरणा करत असतात तसेच लग्नकार्य असेल किंवा आपले दैनंदिन व्यवहार असतील यासाठी नेहमीच रोख पैशांची नितांत गरज असते.या वर्षी तालुक्यामध्ये अत्यल्प झालेल्या पावसाने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने शासनाची दुष्काळी मदत ही शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होत आहेत. परंतु बँकामधे नाणे टंचाई भासत असल्याने याचा त्रास मात्र ग्राहकांना सहन करावा लागत आहे. "आडात आहे पण पोहऱ्यात येईना गत स्थिती" नागरिकांची झाली आहे. आजही बऱ्याच गाव खेड्यात ज्या काही शासकीय बँका आहेत त्या बँकांना ऑनलाईन पैसे हस्तांतरण करण्याच्या सोई सुविधा पाहिजे त्या प्रमानात उपलब्ध नाहीत त्यात अनेक ग्राहकांना ऑनलाईन व्यवहार करता येत नाहीत. त्यामुळे गावखेड्यातील सर्वच संवर्गातील बँक ग्राहकांना नाणे टंचाई चा सामना करावा लागत असल्याने याकडे जिल्हाधिकारी महोदयांनी लक्ष देऊन बँकांचा नाणे टंचाई चा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.




बँकेमध्ये नगदी पैसे काढण्यास गेलो असता कॅश कमी असल्याने पैसे पुरेशा प्रमाणात निघत नाहीत त्यामुळे दैनंदिन गरजा भागविण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत . तसेच विदर्भ ग्रामीण बँकेचे ऑनलाईन व्यवहार करण्यासाठी फोन पे, गुगल पे सुविधा उपलब्ध नसल्याने खात्यात पैसे असूनही आर्थिक चणचण भासत आहे .
**धोंडू राऊत ग्राहक विदर्भ कोकण ग्रामीण बँक लोणी**



# पुरवठा विभागाकडून कारवाईसाठी चालढकल; पाणीमिश्रित पेट्रोलची विक्री

## 'पुरवठा'ला हायकोर्टाची नोटीस

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** सिडको एन- ७, पी सेक्टर येथील रिलायन्स पेट्रोल पंपावर पाणीमिश्रित पेट्रोल विक्री केल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही शासनाकडून कारवाईसाठी चालढकल करण्यात आली. त्यामुळे तक्रारदाराने थेट हायकोर्टात धाव घेतली असता न्यायमूर्ती शैलेश ब्रह्मे आणि न्यायमूर्ती मंगेश पाटील यांनी अन्न व नागरी पुरवठा विभाग, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि रिलायन्स जिओ पेट्रोलियमच्या विभागीय व्यवस्थापकांना नोटीस बजावण्याचे आदेश दिले. १६ नोव्हेंबर २०२१ रोजी रिलायन्स पेट्रोल पंपावर पेट्रोल भरल्यानंतर अनेक नागरिकांची वाहने बंद पडली. याबाबतची तक्रार रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (खरात गट) जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी अप्पासाहेब शिंदे यांच्याकडे केल्यानंतर पुरवठा निरीक्षक विलास सोनवणे यांनी पेट्रोलचे सॅम्पल घेऊन न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवले. २६ डिसेंबर २०२२ रोजी न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेने याचा अहवाल जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना दिला. **पाठपुरावा करून थकल्याने कोर्टात धाव :** मनीष नरवडे यांनी पाणीमिश्रीत पेट्रोल विक्री प्रकरणात पंप मालकावर कारवाईसाठी पुरवठा विभागाकडे गेल्या वर्षभरापासून पाठपुरावा केला. मात्र जिल्हा पुरवठा विभागाने कोणतीही कारवाई केली नसल्याने शेवटी नरवडे यांनी ॲड. अक्षय तिळवे यांच्यामार्फत हायकोर्टात कारवाईच्या मागणीसाठी क्रिमिनल रिट पिटीशन दाखल केले. या याचिकेवर पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी होणार आहे.


केसरी
22 Feb 2024
पाणीमिश्रित पेट्रोल विकणाऱ्यावर कारवाई नाही

# उद्धव ठाकरे वैफल्यग्रस्त : प्रदेशाध्यक्ष बावनकुळे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उद्धव ठाकरे हे वैफल्यग्रस्त आणि निराश मनस्थितीत आहेत. त्यांना बुद्धीभ्रंश झाला आहे. अशा परिस्थितीत उद्धव ठाकरे यांची वैद्यकीय चाचणी करण्याची गरज आहे, असे वक्तव्य भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. ते शुक्रवारी मुंबईतील भाजप मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जहरी भाषेत टीका करताना त्यांचा एकेरी उल्लेख केला. उद्धव ठाकरे हा सत्तेसाठी पिसाळलेला नेता आहे, असे बावनकुळे यांनी म्हटले. त्यामुळे आता ठाकरे गटाकडून बावनकुळेंच्या टीकेला कशाप्रकारे प्रत्युत्तर दिले जाणार, हे आता पाहावे लागेल. उद्धव ठाकरे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा औरंगजेब म्हणून उल्लेख करतात. महाराष्ट्र आणि देशातील जनता ही गोष्ट खपवून घेणार नाही. किंबहुना औरंगजेबी वृत्ती असलेल्या चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वतःच्या भावाला सर्वप्रथम घराबाहेर काढले. त्यांनीच राज ठाकरे यांना दूर केले. सख्ख्या भावासारख्या देवेंद्र फडणवीसांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले.त्यामुळे उद्धव ठाकरे यांचीच वृत्ती औरंगजेबासारखी आहे. सत्तेसाठी पिसाळलेले उद्धव ठाकरे आता मोदींना औरंगजेब म्हणत आहेत. उद्धव ठाकरे 22 जानेवारीची तारीख विसरले का? पण 4 जून येऊ द्या, मग तुम्हाला दिसेल. 2024 ची लोकसभा निवडणूक उद्धव ठाकरे यांच्या आयुष्यातील सर्वात वाईट निवडणूक असेल, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

गेल्या काही दिवसांमध्ये उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्याकडून पंतप्रधान मोदी यांच्यावर थेट हल्ला केला जात आहे. या दोन्ही नेत्यांकडून पंतप्रधान मोदी यांचा उल्लेख औरंगजेब असा केला जात आहे. ही गोष्ट भाजप नेत्यांच्या चांगलीच जिव्हारी लागली आहे. पंतप्रधान मोदी यांची वृत्ती औरंगजेबाची नाही, असे का म्हणायचे नाही? औरंगजेबाने मराठ्यांबाबत लिहून ठेवलं होतं. डोंगरदऱ्यांमध्ये राहणारे मरहट्टे तमाम दुनियेला भारी आहेत. वीरांचा शूरांचा हा इलाखा आहे. पहाडी मुलखात तमाम दुनियेला ते भारी आहेत. इथे पराक्रम शिकवावा लागत नाही. आज औरंगजेबाची वृत्ती शिवसेना आणि राष्ट्रवादी फोडत आहे. तोडा-फोडा आणि राज्य करा.

# नांदुर मधमेश्वर बंधाऱ्याचे वक्राकार दरवाजे बसविण्यास विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** पूरस्थितीने बाधित होणाऱ्या गोदाकाठच्या गावांसाठी राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने नांदूर मधमेश्वर धरणावर नदीच्या तळालगत नव्याने वाढीव १२ मीटर बाय ८ मीटर आकाराचे १० वक्राकार दरवाजे बांधण्यास मान्यता दिली असून या निर्णयाला न्यायालयात आव्हान देणार असल्याचा ईशारा आ.आशुतोष काळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात आ.काळे यांनी असे म्हटले आहे की, दारणा-गंगापूर धरणावर बिगर सिंचनाचे आरक्षण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. दुष्काळी परिस्थितीत जायकवाडी धरण जोपर्यंत ६५ टक्के भरत नाही तोपर्यंत वरच्या दारणा-गंगापूर धरणातून जायकवाडी धरणात पाणी सोडण्यात येते.त्यामुळे गोदावरी कालव्यांना सातत्याने सिंचनाचे आवर्तन कमी प्रमाणात मिळत असून गोदावरी कालव्यावर अवलंबून असलेला शेती व्यवसाय संकटात आहे.त्याबाबत न्यायालयीन संघर्ष सुरु असतांना पावसाळ्यात अतिवृष्टी होवून निर्माण होणाऱ्या महापुरामुळे सायखेडा ते नांदूर मधमेश्वर बंधारा दरम्यान नदी सभोवतालचा परिसर व सभोवतालच्या गावातील पुराच्या पाण्याने होणारी हानी टाळण्यासाठी पाटबंधारे विभागाने नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यास दहा वक्राकार दरवाजे बांधण्यास मंजुरी दिली आहे. यापूर्वीच नांदूर मधमेश्वर बंधाऱ्याच्या उजव्या तीरावर पाच व डाव्या तीरावर तीन असे एकूण आठ वक्राकार दरवाजे बसविले आहेत. पावसाळ्यात आजपर्यंत सदर दरवाजामधून गाळ वाहून गेलेला नाही त्यामुळे हे दहा दरवाजे बांधल्यानंतर गाळ वाहून जाईलच याची शाश्वती नाही.तसेच दरवाजे उघडल्यानंतर गोदावरी उजवा व डावा हे दोनही कालवे पूर्णपणे कोरडेठाक असतात.अशी परिस्थिती असतांना दरवाजे बांधण्याचा अट्टाहास कशासाठी ? असा सवाल करून त्यांनी मागील काही वर्षापासूनची पर्जन्यमानाची आकडेवारी लक्षात घेतल्यास गोदावरी नदीला अपवादात्मक परिस्थितीत पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.सन-१९१० मध्ये धरणाचे बांधकाम झाले त्यावेळी बुडीत क्षेत्राचा मोबदला शासनाने सबंधितांना दिलेला आहे. असे असूनही सबंधितांनी बुडीत क्षेत्रामध्ये पक्की घरे व वीट भट्ट्या टाकलेल्या आहेत त्यामुळे पूर परिस्थिती निर्माण होते हि वस्तुस्थिती आहे.

मात्र पाटबंधारे विभागाने १० वक्राकार दरवाजे बांधण्याचा निर्णय घेतल्यामुळे गोदावरी कालव्याचे लाभक्षेत्र अजूनच उजाड होणार आहे.कमी झालेल्या सिंचनाच्या आवर्तनामुळे अगोदरच पर्जन्यछायेखालील व कायमस्वरूपी अवर्षणग्रस्त असलेल्या कोपरगाव विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांचा शेती व्यवसाय संकटात सापडला आहे.बारमाही ब्लॉकच्या नावाखाली लँड सिलींग कायद्यान्वये जास्तीच्या जमिनी गेल्या व ५० टक्के ब्लॉक्स देखील रद्द करून गोदावरी कालव्यांच्या लाभधारक शेतकऱ्यांवर दुहेरी अन्याय झाला असतांना पुन्हा तिहेरी अन्याय सहन करण्याची क्षमता गोदावरी कालव्यांच्या लाभधारक शेतकऱ्यांची राहिलेली नाही.त्यामुळे लाभधारक शेतकऱ्यांसाठी न्यायालयीन लढाई तर लढतच आहे परंतु त्याचबरोबर राजकीय लढाई देखील लढणार असल्याचे आ.काळे यांनी स्पष्ट केले आहे.

> नांदूर मधमेश्वर बंधाऱ्याची मूळ साठवण क्षमता १००० दलघफुट होती .परंतु गेल्या शंभर वर्षांत साचलेल्या गाळामुळे हि क्षमता २५० दलघफुटावर आली आहे .गाळ वाहून जाण्यासाठी गाळ मोऱ्यांची व्यवस्था असतांना जलसंपदा विभागाने गाळ मोऱ्यांचा नियमित वापर केला नाही परिणामी नदीपात्रातील हाच गाळ खडकाप्रमाणे कडक झाला आहे .या गाळामुळेच बंधाऱ्याच्या वरील भागातील नदीकडच्या गावात पूरस्थिती निर्माण होते .त्यामुळे या कडक गाळाची बंधाऱ्यातून विल्हेवाट लावण्यासाठी दरवाजे बसविण्याची चुकीची कल्पना समोर आणून त्या चुकीच्या कल्पनेला मान्यता देण्यात आली .पाटबंधारे विभागाच्या या चुकीच्या निर्णयाला लाभधारक शेतकऱ्यांच्या वतीने सामुहिक विरोध करण्यासाठी शासन दरबारी भांडू .
> **- आ .आशुतोष काळे,कोपरगाव .**

२०१२ ते २०१६ या चार वर्षात समन्यायी पाणी वाटप कायद्याच्या आधारे जोपर्यंत जायकवाडी धरणाचा साठा ६५ टक्के होत नाही तोपर्यंत सलग चार वर्ष दारणा-गंगापूर धरणातून जायकवाडी धरणात पाणी सोडण्यात आले. त्यामुळे त्या चार वर्षात गोदावरी कालव्यांच्या लाभक्षेत्रातील शेतकरी देशोधडीला लागले. मागील काही वर्षात समाधानकारक पर्जन्यमान झाल्यामुळे दारणा-गंगापूर धरणातून जायकवाडी धरणात पाणी सोडण्यात आले नाही.

मात्र मागील वर्षी पुन्हा एकदा दुष्काळी परिस्थितीमुळे खाली पाणी सोडण्यात आले. सिलिंग कायद्यानुसार १८ एकरपेक्षा जास्त जमिनी काढून घेण्यात येवून त्याबदली कालव्यांच्या ब्लॉकच्या माध्यमातून बारमाही पाणी पुरवठा केला जाईल असे सांगण्यात आले असले तरी ५० टक्के ब्लॉक देखील कमी करण्यात आले व २०१२ नंतर उरलेले ब्लॉक रिन्युअल करण्यात आलेले नाही.त्यामुळे सातत्याने गोदावरी कालव्याच्या लाभधारक क्षेत्रावर अन्याय झालेला असतांना नांदूर मधमेश्वर धरणावर नदीच्या तळालगत नव्याने वाढीव १२ मीटर बाय ८ मीटर आकाराचे १० वक्राकार दरवाजे बांधण्यास शासनाच्या जलसंपदा विभागाने मान्यता देवून ओव्हरफ्लोच्या पाण्यापासून लाभधारक शेतकऱ्यांना वंचित ठेवणे हे लाभधारक क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे.त्यामुळे हा अन्याय कदापि सहन केला जाणार नाही.त्यासाठी न्यायालयीन लढाई तर लढतच असून राजकीय लढाई देखील लढणार आहे परंतु वेळप्रसंगी रस्त्यावर देखील उतरू असा गर्भित ईशारा आ. आशुतोष काळे यांनी दिला आहे.

# औद्योगिक वसाहतीत एटीएम फोडणाऱ्यांना अटक

## मुख्य संशयित आरोपी प्रवीणचा शोध सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** सिन्नर तालुक्यातील मुसळगाव औद्योगिक वसाहतीत सुरक्षा रक्षकाला चाकुचा धाक दाखवत चारचाकी वाहन चोरुन एटीएम फोडणाऱ्या गुन्हेगारास ग्रामीण पोलिसांची स्थानिक गुन्हे शाखा आणि सिन्नर औद्योगिक वसाहत पोलिसांच्या संयुक्त कारवाईत अटक करण्यात आली. मुसळगाव औद्योगिक वसाहतीत औषध पावडर तयार करणाऱ्या कंपनीच्या सुरक्षारक्षकाला चार संशयितांनी चाकु आणि कोयत्याचा धाक दाखवत मारहाण करुन कंपनीतील सीसीटीव्ही कॅमेरा व अन्य सामान उचलण्यासाठी दोरीस बांधले. त्याच दिवशी चोरट्यांनी मुसळगाव परिसरातील सारस्तवत को-ऑपरेटिव्ह बँकेच्या एटीएममध्ये प्रवेश करून सुरक्षा रक्षकाला चोरीचा धाक दाखवत यंत्रातून १४ लाख रुपये लंपास केले. या संपूर्ण प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा आणि औद्योगिक वसाहत परिसर सिन्नर पोलिसांकडून करण्यात येत होता. संशयितांची गुन्हा करण्याची पध्दत, साक्षीदारांनी केलेले वर्णन आणि त्यांची बोलीभाषा यावरून स्थानिक गुन्हे शाखेने माहिती काढत सराईत गुन्हेगार प्रवीण उर्फ भैया कांदळकर आणि त्याच्या सहकाऱ्यांनी हा गुन्हा केल्याचे समजले. पोलिसांनी गोरख सोनवणे (२८, रा. सिन्नर), सुदर्शन ढोकणे (२८, रा. कुसवाडी) यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी प्रवीण आणि एका विधीसंघर्षित बालकाच्या मदतीने मागील आठवड्यात कंपनीतून चारचाकी आणि एटीएम यंत्र चोरण्याचा प्रयत्न केल्याची कबुली दिली. ताब्यात घेतलेल्या संशयितांकडून गुन्हा करण्यासाठी वापरलेला कोयता, भ्रमणध्वनी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संशयितांना सिन्नर औद्योगिक पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून मुख्य संशयित प्रवीणचा शोध घेतला जात आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



## निवडणूक बघता विकासकामांचा धडका

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी परिसरात ग्रामीण भागात सद्या मार्च इन्ड व निवडणूक बघता विकास कामांचा धडाका सुरु आहे परंतु ठिकठिकाणी होत असलेले पुलकामे, सिमेंट बांध कामे, केटी बांध,इतर बांधकामे वाळुविनाच कामे आटोपते घेण्यांत येत आहे व याकडे शासकीय यंत्रणा हेतुता दुर्लक्ष करून निकृष्ट दर्जाच्या कामांना बढावा देत आहे व कामाचा दर्जा गुणवत्ता यास धाब्यावर बसवत आहे हे विशेष. देशातील सर्व विकास कामांत शासन व जनता यांची निधीचा वापर होतो. दोघांच्या निधीतून विकास कामे करण्यात येते काम करताना कामाची माहिती फलक प्रथम लावून कामाची सुरुवात करावी लागते ज्यातून पारदर्शकताचे दर्शन व जनतेला कामाची हमी येते. परंतु खुलताबाद तालुक्यात सर्वत्र विविध विभागाचे विविध विकास कामे माहिती फलक विनाच सर्वत्र सुरु आहे. अनेक तक्रारी बातम्या तोंडी -लेखी माहिती वरिष्ठा पर्यंत देवून खालून वर पर्यंत सर्व मुग गिळून आहे. याबाबत नागरिकांनी काय अंदाज लावावा. हेच कळत नाही. सद्यास्थीत दरेगाव येथे नाल्यांवर गावा जवळ केटी बांध चे काम सुरु आहे. मात्र काम साईडवर कोठेच वाळु नाही निव्वळ दगडी चुरा पावडर सिमेंट खडीचा वापर करत धडाकेबाज काम आटोपते घेण्यांत येत आहे.मात्र येथे कर्मचारी अधिकारी कधिच आढळून आले नाही. आपको जैसे लगे काम करो ,भर अब्दुला गुड थैली मे अशा पध्दतीने थातुरमातुर कामे आटोपती घेण्यात येत असल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागात उघड उघड दिसून येत आहे व ग्रामीणांच्या डोळ्यात धूळफेक करण्यात येत आहे.

## लामणगाव जि.प. शाळेत जिम साहित्य बसविले

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** लामणगाव जिल्हा परिषद शाळेत लहान मुले विद्यार्थ्यांसाठी शारिरीक जोपासना यासाठी विविध जिमसाहित्य बसविण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थी व पालकातून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लामनगाव शाळेत ओपन जिम चे साहित्य बसविण्यात आले या प्रसंगी शालेय अध्यक्ष किशोर मालोदे, माजी सरपंच नवनाथ मालोदे, सदस्य सुरेश मालोदे, सदस्य एकनाथ तात्या मालोदे, मुख्याध्यापक बी. डी. जाधव व सर्व शिक्षक उपस्थित होते.

# पोलिसांची अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाई

## वीस दिवसांत १४ लाखांची अवैध दारू जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी :** लोकसभा निवडणुकांच्या अनुषंगाने आचारसंहितेच्या काळात मतदारसंघातील कायदा व सुव्यवस्था ढासळू नये, म्हणून पोलीस अधीक्षक गडचिरोली, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अहेरी, तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी अहेरी यांनी अवैध धंद्यांवर वेळोवेळी धाडी टाकून त्यांचे विरूद्ध कारवाई करण्याबाबत सूचना दिल्याने जिल्ह्यातील पोलिस यंत्रणा सक्रिय झाली आहे. चामोर्शी तालुक्यातील आष्टी पोलीस पथकाने दिनांक १मार्च २०२४ ते २० मार्च २०२४ पर्यंत छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या अवैध दारूविक्रेत्यांवर धडक कारवाई करत दारुबंदी कायद्यान्वये १७ गुन्ह्याची नोंद असुन १८ आरोपी विरुद्ध गुन्हे नोंद आहेत व एकूण १४,३१,०२०/- रुपयांची अवैध दारू जप्त करण्यात आली आहे नजिकच्या काळात अवैध धंदे करणारे इसमांविरुद्ध भरपूर प्रमाणात कार्यवाही होत असल्याने पोलिस स्टेशन आष्टी हद्दीतील अवैध धंदे करणाऱ्या इसमांचे धाबे दणाणले आहेत

लोकसभा निवडणुकीच्या काळात आचारसंहिता लागू असल्याने, पोलिस यंत्रणेकडून रेकॉर्डवरील आरोपींना हद्दपार करणे, फरार आरोपींचा शोध घेणे, अशा मोहिमा राबवण्यात येत आहेत. त्यात आष्टी पोलीस स्टेशन हद्दीतील अनेक भागांमध्ये अवैध दारू विक्री सुरू असल्याने, अशा



दारूविक्रेत्यांवर धडक कारवाई करण्यात आली. यात दिनांक २० मार्चला वसंतपूर जंगल परिसरात छुप्या पद्धतीने अवैध गावठी दारू गाळण्यासाठी गुळा मोहाचा सडवा तयार करून ठेवला असल्याची माहिती आष्टी पोलीस पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे स्थानिक पोलिसांच्या मदतीने कारवाई करत एकूण १,२०,०००/- एक लाख विस हजार रुपये किमतीची १२०० लिटर प्लॅस्टिक ड्रममध्ये ठेवलेला गुळ मोहाचा सडवा जप्त करण्यात आला आहे. व एक होंडा शाईन कंपनीची दुचाकी वाहन किंमत अंदाजे ४०,००० रुपये व ०६ प्लॅस्टिक ड्रम असा एकूण १,६३,०००/- मुद्देमाल अवैधरित्या पोलिसांना मिळून आल्याने या कारवाईत तालुक्यातील वसंतपूर येथील इंद्रजित शितल मंडल व पारीतोष प्रफुल्ल मिस्त्री यांच्या विरुद्ध पोलिस स्टेशन आष्टी येथे गुन्हा नोंद करून तपासात घेतला असल्याची माहिती पोलिस निरीक्षक विशाल काळे यांनी दिली.



## कानडगाव, विरमगाव, पिंपळगाव, सुलतानपूर येथे कामांना सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील कानडगाव/ मंहमदपूर, विरमगाव,खांडी पिंपळगाव, सुलतानपूर या चार गाव व शिवारात जलबचत कामांना दि.२१ मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ चेंबूर मुंबई तथा चाळीसगाव/कानडगाव मंहमदपूर येथे दर्गाजवळ गांवकरी यांची संयुक्त बैठक चर्चा करुन करावयाची कामे त्याची माहिती यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.व कामाचे स्वरूप पध्दत खर्च याची माहिती यावेळी शेतकऱ्यांना देण्यात आली.व मिशन -५०० कोटी लिटर जलसाठा पाच पाटील टीम तथा शेतकरी व ग्रामस्थ पदाधिकारी यांच्या साक्षिने जलबचत कामांना प्रारंभ करण्यात आले यात जेसीबी मशीन द्वारे नाला खोलीकरण रूंदीकरण बांधातुन गाळ काढणे बांध बांधणे आदि विविध जलबचत कामांना दि.२१रोजी मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली.यावेळी गाव व परिसरातील सरपंच उपसरपंच सदस्य चेअरमन संचालक ग्रामपंचायत सदस्य तथा शेतकरी सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# लोणंद येथे महिला सक्षमीकरण आणि सबलीकरण कार्यक्रम संपन्न

## महिलांना मिळाली विविध व्यवसाय अन् योजनांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** देसाई फूड्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सी.एस.आर फंडच्या माध्यमातून आणि नाफारी संस्था पुणे,युगंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्था सातारा,गर्जे मराठी ग्लोबल,कॅलिफोर्निया यांच्या संयुक्त विद्यमाने लोणंद (ता.खंडाळा)येथील पंचशील बुद्धविहारात महिला सक्षमीकरण आणि सबलीकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी महिलांनी या कार्यक्रमास उपस्थित राहत विविध व्यवसाय आणि विविध योजनांची माहिती जाणून घेतली. आर्थिक दुर्बल घटकातील महिलांना उदयोग मार्गदर्शन पॅकेजिंग, लेबलिंग, फूड सेफटी, मार्केटिंग, ब्रँडिंग यांसह प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उदयोग योजना या संदर्भात तसेच रोजगार निर्मिती बाबतचे विशेष मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रोजेक्टरवर माहिती समजावून सांगितली. महिलांनी सुद्धा विविध प्रश्न विचारीत संवाद साधला. या कार्यक्रम शुभारंभ प्रसंगी लोणंद नगरीच्या नगराध्यक्षा सीमा खरात,माजी नगरसेविका शैलजा खरात, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा डॉ.स्वाती शहा, रजनीताई शिंदे आदींसह इतर मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रम प्रसंगी लोणंद नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सीमा खरात, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा डॉ.स्वाती शहा,माजी नगरसेविका शैलजा खरात आणि सुषमाराजे घोरपडे ह्यांनी महिलांना शुभेच्छा दिल्या. १५० रुपये नोंदणी फी आकारण्यात आली. प्रशिक्षण देणे हा नाफारी संस्था पुणेचा यांचा महत्वाचा भाग असून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांकरिता हे प्रशिक्षण देण्याचे कार्य या संस्थेच्या वतीने पार पाडले जाते. हे आयोजन करण्यासाठी युगंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा सुषमा राजे घोरपडे, गर्जे मराठी ग्लोबलचे सर्जेराव पाटील, प्राची ताकतोडे, नाफारी संस्था पुणेचे अकाऊंटंट पराग भापकर, टेस्टिंग हेड श्रीरंग पोखरकर, ट्रेनिंग मॅनेजर तेजश्री लोकरे, ट्रेनिंग हेड संतोष देवकाते, कन्सलटन्सी समन्वयक प्रतीक्षा भोसले, माजी नगरसेविका शैलजा खरात, पौर्णिमा खरात, शारदा भस्मे, नूतन गायकवाड, नीलम शेळके, रेश्मा खरात, पूजा खरात, रजिया इनामदार आदींनी विशेष मेहनत घेतली.युगंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा सुषमा राजे घोरपडे म्हणाल्या की,महिला बचत गट,वैयक्तिक महिला



व्यवसायिक तसेच ज्या महिलांना घरगुती काम हवं आहे.अशा सर्व महिलांचं एकत्रितपणे ट्रेनिंग आयोजित केलेले आहे.महिला सक्षमीकरण करत असताना महिलांची आर्थिकता प्रबळ करण्याच्या दृष्टीने या ध्येयाने हा कार्यक्रम घेण्यात आलेला आहे. ट्रेनिंग हेड संतोष देवकाते म्हणाले की, आमच्या संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळे ट्रेनिंग प्रोग्रॅम्स,प्रॉडक्ट्स टेस्टिंग,कन्सलटेशन या तीन माध्यमातून आम्ही सर्वांत जास्त सर्विस देत असतो. आतापर्यंत दहा हजार लोकांपर्यंत नाफारी संस्थेने सेवा दिलेली आहे. सेवेमध्ये वेगवेगळ्या ट्रेनिंगचे आयोजन वॉटर टेस्टिंग असेल,फूड टेस्टिंग असेल किंवा ज्यांना नवीन उद्योग सुरू करायचा आहे. अशा संस्थांना सुध्दा आम्ही मदत करत असतो. माजी नगरसेविका शैलजा खरात म्हणाल्या की,महिलांनी आपापल्या पायावर उभं राहावे.हाच उद्देश या कार्यक्रमाचा आहे.महिलांनी स्वतःसाठी चांगल्या पद्धतीने जगण्याचा प्रयत्न करावा.एवढीच माफक इच्छा असते.महिलांना आजही दुय्यमच स्थान मिळत असतं.महिला जेव्हा ती स्वतःच्या पायावर उभी राहते, कुटूंबासाठी किंवा समाजासाठी काही करायला जाते. तेव्हा तिला बराच त्रास होत असतो. ट्रेनिंग मॅनेजर तेजश्री लोकरे म्हणाल्या की, सातारा, वाई, कराड, कवठे, निंबाडी आदी ठिकाणी ही ट्रेनिंग केलेली आहेत. ज्या महिला आर्थिक दुर्बळ घटकातून येतात.त्या महिलांना सक्षम करणे, त्यांना पायावर उभे करणे.यासाठी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उदयोग योजना या योजनेची माहिती असेल याच सोबत काही महिलांचे उद्योग ही आहेत.पापड लोणचे यांसारखे उदयोग आहेत.लेबिंग पॅकेज कसं असलं पाहिजे. फूड सेफ्टी याबाबत तसेच मार्केटिंग कसे केले पाहिजे.हे महिलांना समजावून सांगितले जाते.






# प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक संस्थेचा 'कलारंग' उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सुधीर कोर्टीकर**

**छत्रपती संभाजीनगर :** सिडकोमधील प्रगतिशील जेष्ठ नागरिक संस्थेतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त पुराणातील स्त्रियांवर आधारित पञ्चकन्यां स्मरेत् नित्यम् | हा संगीत,नृत्य, नाट्याने नटलेला कार्यक्रम कलारंग तर्फे सादर करण्यात आला. त्याच बरोबर पुराणातील स्त्रियांवर आधारित काढलेल्या चित्रांचे प्रदर्शन ही भरवण्यात आले होते. ह्यावेळी गीता भवनचे अध्यक्ष भरत कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितीत होते. ह्यात कलारंगच्याच ज्येष्ठ महिला कलाकार वीणा गोसावी ह्यांनी काढलेल्या चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात होते. त्यानंतर पंचकन्याच्या विविध भूमिका नाट्यातून सादर केल्या. जयंती थिगले ह्यांनी अहील्येची भूमिका साकारत अहिल्येचे स्वगत सादर केले.बकुल देशपांडे आणि वैशाली धामणगावकर ह्यांनी द्रौपदी आणि कृष्णाचा संवाद सादर केला. भरजरी ग पितांबर हे गाणं श्रुती बासरकर हिने भावपूर्ण सादर केले. नृत्य दिग्दर्शिका रामेश्वरी देशमुख ह्यांनी बसवलेले नृत्य अवनी कुलकर्णी, श्रावणी कुलकर्णी, अनुष्का माने, कनक चव्हाण ह्यांनी सादर केले. सीतेच्या भूमिकेत सारिका कुलकर्णी ह्यांनी एकपात्री सादर केले. तेजस्विनी जोशी ह्यांनी कीर्तन सादर केले.त्यालाअपर्णा देशपांडे ह्यांनी  साईड रिदमची साथ दिली. संपूर्ण कार्यक्रमाचे संगीत संयोजन तृप्ती कुलकर्णी ह्यांनी केले तर अविनाश ठिगळे ह्यांनी ध्वनी व्यवस्था पाहिली. वैशाली जोशी ह्यांनी निवेदन केले.रुपेश जोशी, समीरण जोशी, चैतन्य जोशी,प्रसाद जोशी,शौनक ठिगळे ह्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक संस्थेचे पदाधिकारी, इतर मान्यवर विशेषतः महिलांची परिसरात नागरिकांची उपस्थितीत लक्षणीय होती. अनेक वृत्तपत्राचे पत्रकार, मान्यवरही मोठ्या संख्येने उपस्थित होते.








# प्रसिद्ध कवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या 'कष्टाच्या वाटा'ला राज्यस्तरीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर येथील पुरोगामी सामाजिक-सांस्कृतिक महासंघ यांच्यावतीने सन २०२४ चा अत्यंत प्रतिष्ठेचा व सन्मानाचा रावसाहेब दहिवाळ राज्यस्तरीय वाङमयीन बालसाहित्य पुरस्कारासाठी बालभारतीच्या पाठयपुस्तकातील प्रसिद्ध कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांचा अतिशय दर्जेदार व आशयघन तसेच साहित्य क्षेत्रात बाल-किशोर-कुमारांसाठी वाचनीय असलेला " कष्टाच्या वाटा " या बाल कथासंग्रहाला राज्यस्तरीय रावसाहेब दहिवाळ बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. असे पुरोगामी सामाजिक- सांस्कृतिक महासंघाचे पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष श्री. समाधान दहिवाळ यांनी नुकतेच निवड पत्राद्वारे अय्युब पठाण यांना कळविले आहे. या पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल-श्रीफळ असे असून लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या पहिल्या स्त्रीवादी साहित्य संमेलनात कवी अय्युब पठाण यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक बालसाहित्य पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.अय्युब पठाण लोहगावकर यांची " पाणपोई " ही कविता बालभारतीच्या इंग्रजी माध्यम इयत्ता सहावीच्या शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. कवी अय्युब पठाण यांची आज पर्यंत तेरा पुस्तके प्रकाशित आहे. अय्युब पठाण यांच्या या यशाबद्दल गावकरी व मित्रमंडळी तसेच मराठी साहित्यक्षेत्रात त्यांचे अभिनंदन होत आहे.




# दहावीच्या विद्यार्थ्यांना मिळणार अतिरिक्त गुण?

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची इयत्ता दहावीची परीक्षा सुरू आहे. परीक्षा सुरळीत सुरू असली तरी एका प्रश्नपत्रिकेतील चकीवरून वाद उठला आहे. विज्ञान विषयाच्या प्रश्नपत्रिकेत एका संदिग्ध प्रश्नाच्या दोन्ही उत्तरांना अतिरिक्त गुण देण्याबाबत आमदार कपिल पाटील यांनी राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर आणि बोर्डाला पत्र लिहिले आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दहावीच्या बोर्डाच्या परिक्षेत विज्ञान एक या विषयाचा पेपर अठरा मार्च रोजी झाला होता. त्यात सर्वात लहान आकाराच्या अणूचे नाव लिहा, असा एक प्रश्न विचारण्यात आला होता. पण त्या प्रश्नाच्या उत्तराबाबत विद्यार्थी आणि पालक यांच्या मनात संदिग्धता निर्माण झाली आहे. अनेक पालकांनी याबाबत आपल्याकडे चिंता व्यक्त केल्याचं आमदार कपिल पाटील यांनी पत्रात म्हटले आहे. वैज्ञानिकदृष्ट्या विचार करता या प्रश्नाचं अचूक उत्तर 'हायड्रोजन' हे आहे. पण काही शाळांमध्ये या प्रश्नाचं उत्तर 'हेलियम', तर काही शाळांमध्ये योग्य उत्तर 'हायड्रोजन' असल्याचं सांगण्यात येत आहे. त्यामुळं विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे, याकडे आमदार पाटील यांनी लक्ष वेधले आहे. कपिल पाटील यांनी पत्रात म्हटलं आहे की, "हायड्रोजनच्या अणुत्रिजेची गणना मूल्य ५३ पीएम आहे तर हेलिअमच्या अणुत्रिजेचे गणना मूल्य ३१ पीएम आहे; कारण जेव्हा आपण डावीकडून उजवीकडे जातो तेव्हा अणुत्रिज्या कमी होण्याची शक्यता असते. हायड्रोजन हा द्वि-आण्वीय वायू आहे तर हेलिअम हा एक-अण्वीय वायू आहे. त्यामुळे, अणुत्रिज्यांच्या गणना केलेल्या मूल्यांची तुलना करणे योग्य नाही. दोन्ही अणूंची 'बॅन दे वॉल्झ' त्रिज्यांची तुलना करणे अधिक योग्य ठरेल. हायड्रोजन अणूची बॅन दे वॉल्झ त्रिज्या ही १२० पीएम आहे तर हेलिअम अणूची वॅन दे वॉल्झ त्रिज्या ही १४० पीएम आहे.



# जागतिक वन दिनानिमित्त वन विभागांकडून वेरूळ येथे वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वेरूळ येथे जागतिक वन दिनानिमित्त वनविभागाच्या वरिष्ठ अधिकारी यांच्या हस्ते ठिकठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. दिनांक 21-03-2024 रोजी जागतिक वन दिनानिमित्त वनपरीक्षेत्र कार्यालय खुलताबाद प्रादेशिक अंतर्गत मौजे वेरूळ येथील महादेव वन उद्यानामध्ये मा. उप वनसंवरक्षक श्री. सूर्यकांत मंकावार साहेब (भा.व. से.)वनविभाग छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक यांचे मार्गदर्शना खाली तसेच त्यांचे प्रमुख उपस्थितीत वनपरीक्षेत्र कार्यालय खुलताबाद अंतर्गत सर्व स्टाफ श्री.ए. आर. पेहरकर, वनपरीक्षेत्र अधिकारी खुलताबाद श्री. दादा तौर, वनपरीक्षेत्र अधिकारी छ. संभाजीनगर वनपाल श्री मनोज उधार, कैलास पचलोरे, श्रेया कोटूरकर, वनरक्षक कृष्णा शिंदे, राम मुळे, सोमीनाथ बर्डे, मयूर चौधरी, कडपे, जावेद सय्यद, दीपक वाघ, सुभाष मातेरे, जाधव तसेच वनमजूर सर्वांच्या वतीने जागतिक वन दिनानिमित्त वेरूळ वन उद्याना मध्ये वृक्षा रोपण करून जागतिक वन दिन साजरा करण्यात आला. व प्रमुख उपस्थितीत मा. श्री. मंकावार साहेब यांनी सर्व अधिकारी व कर्मचारी यांना वनाचे महत्व पटवून दिले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर